११८ म. ग्रं. सं. ठाणें
विषय
लेखक
सन
संग्रहालय क्रमांक ११७ ११८
पुस्तकाचें नांव निबंधावली
भाग - १ ला

९९९
सं.क्र. ११८

# निबंधावली

(भा. १ ला)

निबंध

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. नं. ९९४
...न ९८८

...ाकरांतून प्रसिद्ध झालेलें

# निबंधावलि.

## भाग १ ला.

हें पुस्तक

आप्पाजी विष्णु कुलकर्णी

एडिटर “शिक्षक” व “ग्रंथरत्नाकर”

यांनीं लिहिलें

तें

चिकोडी येथें

ज्ञानप्रसारक छा० छा० प्र० केलें.

किंमत ८ आणे.

( सर्व हक्क राखिले आहेत )

( ग्रंथरत्नाकरांतून प्रसिद्ध झालेली. )

# निबंधावलि.

सं. नि. ८०

भाग १ ला.

हें पुस्तक

आप्पाजी विष्णु कुलकर्णी

एडिटर "शिक्षक" व "ग्रंथरत्नाकर"

यांनीं लिहिलें

तें

चिकोडी येथें

ज्ञानप्रसारक छा० छा० प्र० केलें.

किंमत ८ आणे.

( सर्व हक्क राखिले आहेत )

ग्रंथरत्नाकर:



तुकाराम.

जन्म इ० स० १६०८ मृत्यु इ० स. १६४९.

सं. नि. ८४

# निबंधावलि.

## मनोनिग्रह.

इंद्रियाणां प्रसंगेन दोषमृच्छति मानवः ॥
सन्नियम्य तु तान्येव सिद्धिं समधिगच्छति ॥ १ ॥ मनु.

आयुष्य ही एक लढाई आहे. ती प्रत्येक मनुष्यानें लढली पाहिजे. तींत जखम न लागतां सुरक्षितपणें पार पडावें असें ज्याला वाटत असेल, त्यानें मनोनिग्रह केला पाहिजे. जो योद्धा मनोनिग्रह करीत नाहीं तो आपल्या शत्रूला आपणावर हल्ला करण्याची संधि आपण होऊन आणून देतो; व अशी संधि केव्हां येईल म्हणून एकसारखा टपून बसलेला त्याचा शत्रु संधि सांपडतांच त्याजवर हल्ला करून त्याचा पराभव करितो. जो योद्धा मनोनिग्रह करितो त्याला पुष्कळ पाठबळ मिळतें व शत्रूपासून त्याला मुळींच पीडा होत नाहीं. मनोनिग्रहांत पुष्कळ गोष्टी येतात. शांतस्वभाव, इंद्रियदमन, सारासारविचार, प्रबळ इच्छा अथवा अनावर कल्पना हीं ताब्यांत ठेवण्याची शक्ति हे सर्व मनोनिग्रहाचेच भाग होत. मनोनिग्रहाचा अर्थ हाच कीं, तुकोबारायांप्रमाणें[1] आपल्या मनोवृत्ति पूर्णपणें आपल्या ताब्यांत

---

१ तुकाराम:—जन्म इ० स० १६०८. मृत्यु १६४९ हा पुण्यापासून नऊ कोसावर देहू म्हणून एक लहान गांव आहे तेथें राहत असे. याचा बाप जातीचा शूद्र असून वाणीपणाचा धंदा करी. याचें लहानपणापासून संसाराकडे लक्ष्य नव्हतें. त्यांतून त्याची बायको जिजाबाई ही स्वभानें द्वाड असून त्याला फार त्रास देई. त्यामुळें तो अधिकच विरक्त झाला. हा स्वतः अभंग करी व कथाकीर्तनें करून लोकांना उपदेश करी. याचे सुमारें ४६०० अभंग उपलब्ध आहेत. हा महान् साधुपुरुष होऊन गेला. याला लोक देवाचा अवतार मानितात व कथाकीर्तनांतून याच्या नामाचा जयघोष करितात.

ठेवणें. तुकोबारायाची जी अलौकिक पुरुषांत गणना करितात किंवा त्याला देवाचा अवतार असें जें समजतात त्याचें कारण त्याच्या अंगीं मनोनिग्रह करण्याची मोठी शक्ति होती हें होय. ही शक्ति केवढी विलक्षण होती हें पुढील उदाहरणावरून कळून येईल. एकदां एक स्त्री विषयसुखाच्या प्राप्तीसाठीं त्याच्याकडे गेली. त्यावेळीं त्यानें तिला असा उपदेश केलाः—

अभंग

स्त्रियांचा तो संग नको नारायणा। काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या ॥ १ ॥
नाठवे हा देव न घडे भजन। लांचावलें मन आंवरेना ॥ २ ॥
दृष्टिमुखें मरण इंद्रियांच्या द्वारें। लावण्य तें खरें दुःखमूळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी अग्नि झाला साधु। परी पावे बाधूं संघटणें ॥ ४ ॥

२

पराविया नारी रखुमाईसमान। हें गेलें नेमून ठायींचेंची ॥ १ ॥
जाई चो तूं माते न करी सायास। आह्मी विष्णुदास नव्हों तैसे ॥ २ ॥
न साहावें मज तुझें हें पतन। नको हें वचन दुष्ट वदों ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज पाहिजे भ्रतार। तरी कां इतर लोक थोडे ॥ ४ ॥

३

अवघ्या संसाराचा केलासे निर्वंश। झालों हरिदास आवडीनें ॥ १ ॥
घरीं रांडापोरें गांजिताती फार। ह्मणोनी दारोदार फिरतसें ॥ २ ॥
ठायींचा नपुंसक ठावे माझ्या चित्ता। यावरी लोकांना कळलें असे ॥ ३ ॥
काय आमचें जिणें वायां जावें माये। नायकों तें काय विषय कोडें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां झालिसी उदासी ॥ नवमास कुसीं वागविलें ॥ ५ ॥

४

पोसणा मी बेटा देवासी जंजार। दुजा वहुभार घालूं नको ॥ १ ॥
अरवट देह पडो कोणे ठायीं। जन्म याला नाहीं सर्व याची ॥ २ ॥
कवणाची सेवा घ्यावी कोणाकून। सर्व नारायण प्रगटला ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज बोलतां उत्तर। अझुनीया फिर माय मागें ॥ ४ ॥

२ ग्रीस देशांत सॉक्रेटीस[१] या नांवाचा एक नामांकित तत्ववेत्ता होऊन गेला. त्याला आमच्या तुकोबारायाप्रमाणेंच सर्व लोक पूज्य मानितात. तो पराकाष्ठेचा क्षमाशील असून त्याच्या अंगीही मनोनिग्रह करण्याची मोठी विलक्षण शक्ति होती. त्याची बायको फार कजाग, आर्प आणि द्वाड असल्यामुळें ती वरचेवर त्याला त्रास देई. ' तिनें कोणती शिवी ह्मणून त्याला द्यावयाची वगळली नाहीं किंवा कोणताही उपद्रव करावयाचा ठेविला नाहीं. कधीं कधीं ती त्यावर अशी संतापे आणि बेफाम होऊन जाई कीं, ती उभ्या रस्त्यांत त्याचीं वस्त्रें फाडी. ' इतकें होई तरी सॉक्रेटीस तोंडांतून चकार शब्द काढीत नसे. ' एकदां तर तिनें त्वेषाच्या भिरीरींत तोंडांत ज्या शिव्या आल्या त्या सर्व देऊन शेवटीं त्याच्या डोईवर घाणेऱ्या पाण्याची घागर ओतली. असें तिनें केलें तरी तो हंसून इतकेंच बोलला कीं, असा कडकडाट झाल्यावर पाऊस पाहिजेच होता. '

३ पदार्थापदार्थांत आकर्पणशक्ति किती असते याविषयीं नियम

---

[१] साक्रेटीसः—जन्म इसवी सनापूर्वी ४६८. मृत्यु इ० स० पूर्वी ३९९. याचा बाप मूर्तिकार होता व आई सुइणपणाचा धंदा करी. हा प्रथमतः आपल्या बापाचा धंदा शिकला व त्यांत त्यानें प्राविण्य मिळविलें. पुढें आर्किलेयस याच्या हाताखालीं यानें तत्वज्ञानाचा अभ्यास केला. हा निरपेक्षबुद्धीनें अथेन्स शहरांतील तरुण मुलांना तत्वज्ञानाचा उपदेश करी. यानें पुष्कळ दिवस सैन्यांत चाकरी करून मोठे जय मिळविले. याच्या बायकोचें नांव जांतपी. ही आर्ष व द्वाड असल्यामुळें सॉक्रेटिसाला तिजपासून पुष्कळ त्रास होई. हा स्पष्टवक्ता; निर्भीड व खऱ्याचा भोक्ता असल्यामुळें याला अनेक शत्रू उत्पन्न झाले. त्यांनीं याजवर राजद्रोहाचा, नास्तिकपणाचा आणि तरुण लोकांस बिघडविण्याचा आरोप आणिला; आणि, न्यायाधीशांनीं तो खरा ठरवून त्यास देहान्त प्रायश्चित्ताची सजा दिली व शेवटीं विष देऊन जिवें मारविलें. मरणांनतर त्याची मोठी ख्याति झाली.

काढणारा जो न्यूटन त्याचीही अशीच एक गोष्ट आहे. त्यानें पुष्कळ शोध करून कांहीं नियम काढिले होते. व ते नियम एका कागदावर टिपून ठेवून तो कागद त्यानें आपल्या अभ्यासाच्या खोलींतील टेबलावर ठेविला होता. एके दिवशीं रात्रीं त्याचा आवडता कुत्रा त्या खोलींत आला व त्यानें टेबलावर जी मेणबत्ती जळत होती ती त्या कागदावर पाडिली. न्यूटनला कांहीं काम होतें ह्मणून तो खोलीबाहेर गेला होता. आंत आल्यावर त्यानें पाहिलें तों तो कागद अगदीं जळून त्याची राख झाली आहे असें त्याला आढळून आलें. कैक वर्षे मेहनत करून शोधून काढिलेले नियम एका

न्यूटनः—हा इंग्लंडांत एक अतिविख्यात तत्ववेत्ता व गणिती होऊन गेला. जन्म इ. स. १६४२. मृत्यु इ. स. १७२७. याचा विद्याभ्यास केंब्रिज येथील ट्रिनिटि कॉलेजांत झाला. यानें २२ व्या वर्षी बी. ए. ची पदवी मिळविली व तेथून यंत्रांच्या साहायानें प्रकाश व रंग यांच्या गुणधर्माविषयींचा अभ्यास चालविला. इ. स. १६६५ या वर्षी लंडनमध्यें जेव्हां मोठा प्लेग सुरू झाला तेव्हां तो आपली जन्मभूमी वूल्सथ्रोप येथें आला. तेथें मित्रमंडळी व पुस्तकें हीं नसल्यामुळें त्याचें संभाषण व वाचन बंद पडलें व तो नेहमीं विचारांत निमग्न होऊं लागला. एके दिवशीं तो आपल्या बागेंत एकटाच बसला असतां झाडावरून एक सिताफळ पडतांना त्याच्या दृष्टीस पडलें. तें पाहून पृथ्वीच्या आकर्षणशक्तीची कल्पना त्याच्या मनांत आली व त्यावरून पुढें आकर्षणशक्तीसंबंधानें त्यानें अनेक नियम बांधले. इ. स. १६६७ या वर्षी त्यानें एम्. ए. ची पदवी मिळविली. यानें स्वतः कांहीं दुर्बिणी तयार केल्या होत्या. याच्या दुर्बिणींपैकीं एक दुर्बिण अद्यापि रॉयल सोसायटीच्या लायब्ररींत आहे. याची कांहीं दिवस केंब्रिज युनिव्हर्सिटीतर्फे पार्लमेंटांत निवड झाली होती. हा १७०३ मध्यें रॉयल सोसायटीचा अध्यक्ष होता. व पुढें सतत २५ वर्षे तें काम याच्याकडे होतें. न्यूटनचें लग्न झालें नव्हतें. याविषयीं याच्या चरित्रकाराचें असें ह्मणणें आहे कीं, तो सदासर्वदा शास्त्रीय शोधांच्या विचारांत इतका निमग्न असे कीं, लग्न करावयाचा विचारच त्याच्या मनांत आला नसेल. याला लॅटिन भाषा चांगली येत होती. यानें प्रकाश, रंग, परावर्तन इ० विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

. . . . श्र. अं. . . .

क्षणांत नाहींसे झालें व उतार वयामुळें त्याच्याहातून पुन्हां तितके श्रम होण्याची बिलकुल आशा नसल्यामुळें न्यूटननें त्या कुत्र्यावर किती रागावावें व त्याला केवढी शिक्षा करावी ! पण नाहीं. रागाचा एक चकार शब्द न काढितां व कसलीही शिक्षा न करितां तो शांतपणानें व गंभीर स्वरानें ह्मणाला 'मोत्या, तूं माझें केवढें नुकसान केलेंस हें तुला कशानें समजणार ! '

४ इंग्लंडांत **रॉबर्ट एन्सवर्थ** ह्मणून एक लॅटिन भाषेचा कोशकर्ता होऊन गेला. तोही असाच शांत होता. त्याची बायको मोठी रागीट होती. तिनें एकदां काय केलें कीं, रागारागानें सगळे शब्द लिहिलेली त्याची वहीच जाळून टाकिली. पण बिचाऱ्यानें तोंडांतून एक अवाक्षरही न काढितां मुकाट्यानें आपली लेखणी घेतली व पुन्हां लिहिण्यास सुरुवात केली ! !

५ **थॉमस कारलाइल** यालाही एकदां असाच प्रसंग आला होता. पण मनोनिग्रहानें त्यांतून तो पार पडला. यानें 'फ्रान्स देशांतील

---

१ रॉबर्ट एन्सवर्थः—जन्म इ० स० १६६०. मृत्यू इ० स० १७४३. याचा बोल्टन येथें विद्याभ्यास झाला. यानें कांहीं दिवस बोल्टन येथें व कांहीं दिवस लंडन येथें शाळा घातली होती. यानें लॅटिन भाषेतून इंग्लिश भाषेत एक मोठा कोश लिहिला आहे. हा कोश लिहिण्यास त्याला वीस वर्षे लागलीं.

२ थॉमस कारलाइलः—हा इ० स० १७९५ या वर्षी स्काटलंडांत जन्मला. यानें ऐतिहासिक व राजकीय विषयांवर लहान मोठे बरेच ग्रंथ लिहिले आहेत त्यांत 'फ्रेडरिक धि ग्रेट याच्या वेळचा इतिहास' 'ऑलिव्हर क्रॉमवेलचीं पत्रें व भाषणें' 'जॉन स्टार्लिंगचें चरित्र' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या खेरीज यानें 'एडिंबरो रिव्ह्यूंतूनही अनेक लेख प्रसिद्ध केले आहेत. याला जर्मन भाषेचें चांगलें ज्ञान होतें. हा इ० स० १८८१ या वर्षी मरण पावला.

राज्यक्रांति ' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला होता व तो वाचून पाहण्याकरितां त्याची हस्तलिखित प्रत त्यानें आपल्या एका मित्रास दिली होती. त्याच्या मित्रानें ती वाचतां वाचतां एके दिवशीं निष्काळजीपणानें आपल्या दिवाणखान्यांतील जमिनीवर ठेविली व तो बाहेर गेला. पुढें त्याची मोलकरीण दिवाणखाना झाडण्याकरितां आंत आली व तिच्या दृष्टीस ती प्रत पडली. तिनें रद्दींतले कांहीं कागद पडले आहेत असें समजून तिचा विस्तव पेटविण्याकडे उपयोग केला ! एखाद्यानें मोठ्या मेहनतीनें एखादा ग्रंथ लिहिला असला आणि तो कोणी तरी जाळून टाकिला तर त्याचा त्याला किती राग येईल बरें ? पण कारलाइलला जेव्हां ही गोष्ट समजली तेव्हां त्यानें तीबद्दल त्या मोलकरणीपाशीं एक ब्रसुद्धां काढिला नाहीं. व मोठ्या धैर्यानें आठवून आठवून पुन्हां त्यानें तो ग्रंथ साग्र लिहिला.

६ मनोनिग्रह हें एक चिलखत आहे. घनघोर युद्धांत चिलखत जसें शत्रूच्या माऱ्यापासून योद्ध्याचें संरक्षण करितें, तसें आयुष्याच्या लढाईंत मनोनिग्रह हा मनुष्याचा सर्वस्वी घात करणार जे कामक्रोधादि षड्रिपु त्यापासून त्याचें संरक्षण करितो. समुद्रांत ज्याप्रमाणें प्रचंड लाटा, वादळें व तुफानें हीं व्हावयाचींच, त्याप्रमाणें आयुष्यांत अनिवार संकटें, हाल व अडचणी हीं यावयाचींच. पण ज्याला ह्मणून जलपर्यटणापासून आपल्या ज्ञानांत व सुखांत भर टाकावी असें वाटतें, त्यानें जसें वादळें व तुफानें यांना न जुमानतां बेधडक समुद्र प्रवास केला पाहिजे, त्याप्रमाणें ज्याला ह्मणून संसारयात्रा सुखानें करावी असें वाटतें त्यानें दुःखें व संकटें यांशीं सपाटून टक्कर देत देतच आयुष्यक्रमण केलें पाहिजे. योद्ध्याला लढाई तर केली पाहिजे. मग मेघगर्जना, विजांचा कडकडाट, दलदल, आडमार्ग, चिखल, कांटेकुटे यांना भिऊन चालेल काय ? त्याप्रमाणें

..तुण्याला अयुष्याशीं तर झुंजलें पाहिजे; मग क्लेश, विपत्ति, कठिण प्रसंग, हाल, संकटें यांना भिऊन काय उपयोग ! दुःखाचा प्रसंग कठिण तर खराच; पण धैर्य धरून त्याकडे थोडें टवकारून पाहिलें कीं पुरे, तो लागलच पळून गेला ह्मणून समजावें. आणि भीत भीत त्याकडे पाहिलें कीं, आपल्यावर झडप घालून त्यानें आपला चेंदामेंदा उडविला असें खास समजावें ! दुःखाला हार जाण्याची संवय ज्यांना लागली असते त्यांना ठरीव बाक्षिसें ह्मणजे शोक आणि निराशा हींच होत. क्रूर श्वापद अंगावर चालून आलें असतां त्याला अंजारणें गोंजारणें हा कांहीं त्यापासून आपला बचाव करण्याचा मार्ग नव्हे; तर त्याशीं दोन हात करून त्याचा फडशा उडविणें हाच जसा योग्य मार्ग आहे, तसा कठिण प्रसंग आला असतां ‘ आतां काय करावें ! ’ असें रीं रीं करीत बसणें हा कांहीं तो टाळण्याचा मार्ग नव्हे; तर हिंमत धरून त्याशीं टक्कर देणें हाच खरा मार्ग होय. रीं रीं करीत बसलें कीं, त्यानें आपणास घेरलेंच आणि बेधडक चालून गेलें कीं, त्याचें आटपलेंच. विपत्तीशीं झगडल्यानें मनुष्याचे अमुकच फायदे होतील हें जरी नेहमीं सांगतां येत नाहीं, तरी या जगांत विपत्ति जर नसती तर मान किंवा कीर्ति यांचें नांव सुद्धां ऐकूं आलें नसतें. आजपर्यंत अनेक पुरुष उदयाला आले याचें कारण पुष्कळ अंशीं विपत्ति हेंच होय. विपत्ति जर नसती तर मनोनिग्रही मनुष्याचें तेजच या जगांत पडलें नसतें. मनोनिग्रहाची खरी परीक्षा विपत्तीशिवाय दुसऱ्या कशानेंही होत नाहीं. आणि ज्या अर्थीं अयुष्यांत मनुष्याची पावलोंपावलीं विपत्तीशीं गांठ पडते, त्या अर्थीं मनोनिग्रह हें सर्व सद्गुणांचें बीज आहे असें मानिलें पाहिजे. अनुभवावरून आपणाला अशी एक गोष्ट कळून येते कीं, स्वस्थ बसून जे अयुष्याचा उपभोग घेतात त्यांना सुख कधींच मिळत नाहीं. जमि·

नीत जेव्हां नांगर कुळव घालावा तेव्हां पुढें पीक चांगलें येतें. तसें मनुष्यानें अगोदर दुःख भोगावें तेव्हां पुढें त्याला सुख होतें.

७ दुःखानें मनुष्याचेठायीं मोठी शक्ति येते. वास्तविक पाहिलें तर दुःख कांहीं नवीन शक्ति देत नाहीं. तर दुःखामुळें आपल्या अंगीं जी गुप्त शक्ति असते तीच प्रगट होते. गंजलेली तरवार धार लावण्याच्या धोंड्यावर घांसली ह्मणजे तिला ज्याप्रमाणें धार येते, त्याप्रमाणें आपल्या हिंमतीला अडचणीचा धोंडा मिळतांच तिला उत्तम धार येते. मनुष्यस्वभावांत जितकें ह्मणून चांगलें, शुद्ध व निर्मळ आहे तितकें सर्व दारिद्य, दुःख, निराशा व प्रतिकार यांच्या योगानेंच बाहेर पडतें. विवेकानेंच फक्त अडचणीला जिंकतां येतें व सतत उद्योग आणि दीर्घ परिश्रम यांनींच मार्गांतील अडथळे एकीकड सारतां येतात. हाल, अपेष्टा, अपयश, निराशा हींच मनुष्यांत खरें पाणी आहे किंवा नाहीं तें पाहतात व हींच मनुष्याच्या अंगीं मनोनिग्रह आणितात.



श्रीमन्महाराज श्रीशिवछत्रपति.

जन्म इ. स. १६२७. मृत्यु इ. स. १६८०

( निबंधावलि. पान १३ पहा. )

# बिनचूक तर्क करितां येणें.

१ आयुष्यांत सुख मिळण्यास बिनचूक तर्क करितां येणें हा एक गुण मनुष्याच्या अंगीं असला पाहिजे. बिनचूक तर्क करितां येणें याचा अर्थ असा कीं, मनुष्याला रोजच्या व्यवहारांत नफातोटा, जयअपजय, सुखदुःख हीं जीं होतात तीं कशामुळें होतात याचें ज्ञान असणें. हें ज्ञान ज्याचेठायीं असतें तो बहुतकरून तोट्यापासून अलिप्त असतो व त्याला दुःखही सहसा भोगावें लागत नाहीं. ज्या मनुष्याला बिनचूक तर्क करितां येतो त्याला कोणत्याही कामांत हटकून जय येतो व त्याचें आयुष्य सुखसमाधानांत जातें.

२ कित्येक लोक काय ह्मणतात कीं, ‘ मनुष्याला कोणत्याही कामांत जय येणें किंवा न येणें हें त्याच्या नशिबावर अवलंबून आहे. नशीब चांगलें असेल तर त्याला जय येईल व नशीब वाईट असेल तर त्याला अपजय येईल. ’ हें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. मनुष्याला जय येतो तो त्याच्या उद्योगानें व आलेली संधि फुकट न घालवितां तिचा तात्काळ योग्य उपयोग केल्यानें येतो. असें असून ‘ नशीब चांगलें असतें ह्मणून जय येतो ’ असें जे ह्मणतात त्यांना काय ह्मणावें ?

३ ‘ दैवानेंच द्यावें आपल्याहातून काय होणार आहे ? ’ अशी कुरकुर जे लोक करितात ते बहुतकरून आळशी व निरुद्योगी असतात. काम करावयाचें त्यांच्या जिवावर येतें व बसून चैन भोगावी असें त्यांना वाटतें. त्यांना एखाद्या कामांत अपजय आला ह्मणजे त्याचा दोष आपल्याकडे न घेतां ते दैवाला लावितात. ह्मणजे अपयशाचें कारण असतें एक आणि दोष मात्र भलत्यालाच !

४ कित्येक लोक आपल्या चुकीकडे न पाहतां जयापजयाचा सगळा हवाला दैवावर अथवा दैवाप्रमाणेंच मानिलेल्या वेळेवर टाकितात. जय आला ह्मणजे ते काय ह्मणतात कीं, ' वेळच आमच्या बऱ्यावर होती ह्मणून जय आला, नाहीं तर आमच्याहातून काय व्हावयाचें आहे ? ' बरें, अपजय आला तरी ' ती वेळच वाईट लागली ह्मणून आह्मांस अपजय आला, त्याला आह्मी तरी काय करावें ? ' असें ह्मणून ते वेळेलाच दोष देतात. आतां वास्तविक पाहूं गेलें तर वेळेवर जयापजयाचें किती अवलंबून असतें बरें ? व्यवहारांतील लाखों घडामोडींत वेळेचा पुष्कळ उपयोग होतो व वेळेवर काम केलें तर जय येतो नाहींतर अपजय येतो हें जरी खरें आहे, तरी वेळेचा योग्य उपयोग करणें किंवा न करणें हें सर्वथैव त्यांच्याच स्वाधीन असतें. आलेल्या संधीचा योग्य उपयोग केला तर त्यांना जय येईल आणि ती फुकट घालविली तर अपजय येईल. ह्मणजे वेळेचा सदुपयोग किंवा दुरुपयोग करणें हें सुद्धां त्यांच्याच स्वाधीन असून जयाचें यशही ते वेळेलाच देतात व अपयशाचें खापरही ते वेळेवरच फोडितात तेव्हां त्यांना काय ह्मणावें !

५ कित्येक लोकांचें असें ह्मणणें असतें कीं, ' काय करावें हो ! आमची स्थिति वाईट नसती किंवा कित्येक गोष्टी आह्मांस प्रतिकूल नसत्या तर आह्मी काय पाहिजे तें केलें असतें. ' स्थिति वाईट किंवा गोष्टी प्रतिकूल ही कुरकुर जे उद्योगी, नियमित व सारासार विचार करणारे असून ज्यांच्या अंगीं धैर्य असतें ते कधींच करावयाचे नाहींत. जे ह्मणून आळशी, उधळे व मूर्ख असतात व ज्यांचे अंगीं धैर्य साहसादि गुण मुळींच वास करीत नाहींत तेच अशी कुरकुर करितात. एवढीशी अडचण पुढें आली कीं, तिला पाहून ते अगदीं गांगरून जातात व थोडासा कठिण प्रसंग गुदरला कीं, ते अगदीं निराश होऊन बसतात.

१ इंग्लंडांत **रिचर्ड कंबरलंड** म्हणून एक नाटककार होऊन गेला. त्यानें आपल्या एका हास्यरसप्रधान नाटकांतील एका पात्राच्या तोंडांत पुढील भाषण घातलें आहे:—" मी जो निराश झालों आहें तो एवढ्या तेवढ्याशा कारणावरून झालों आहें असें नाहीं. उदरनिर्वाह चालावा म्हणून मी होते नव्हते तेवढे सर्व मार्ग स्वीकारिले; पण मला पोटभर अन्न कांहीं मिळालें नाहीं. बरें, अन्नाकरितां खटपट व परिश्रम हीं तरी कांहीं मीं कमी केलीं ! मनुष्याला जे जे उपाय व ज्या ज्या युक्त्या करितां येतील त्या सर्व मीं करून पाहिल्या; पण माझी अन्नाची ददात कांहीं तुटली नाहीं. या धंद्यानें आपला उदरनिर्वाह होत नाहीं, दुसरा करावा; दुसऱ्यानें होत नाहीं, तिसरा करावा; याप्रमाणें मीं अनेक धंदे केले. पण जो धंदा करावा तो माझ्या अंगशीं आला. मी सार्वजनिक उलाढालींत पडलों; स्वतंत्रतेकरितां आतोनात ओरडलों; स्वदेशसेवा करण्यास तयार झालों; फार तर काय, राजद्रोहात्मक अनेक भाषणें व अनेक लेखही लिहिले. आणि इतकें करूनही जेव्हां माझ्या पोटाला मिळालें नाहीं तेव्हां मला असें वाटूं लागलें कीं, याउप्पर आपला उदरनिर्वाह कांहीं चालत नाहीं. मग मी पुस्तकें विकण्याचा धंदा करूं लागलों. पण लोकांनीं वाचायाचेंच सोडून दिलें ! आणि जर मी धान्यविक्या झालों असतों, तर मला वाटतें कीं, लोकांनीं अन्न खावयाचेंच सोडून दिलें असतें ! ! " यांतील शेवटच्या वाक्यावरून

---

१ **रिचर्ड कंबरलंड:**—जन्म इ० स० १७३२. मृत्यु इ० स० १८११. यानें धर्मोपदेशकाचा धंदा करावा या हेतूनें याच्या आईबापांनीं याला लहानपणीं धार्मिक शिक्षण दिलें होतें. पण पुढें तो हेतु सिद्धीस गेला नाहीं. याला ट्रेडबोर्डनें आपला सेक्रेटरी नेमून स्पेनदेशांत पाठविलें होतें. तेथून परत आल्यानंतर यानें नाटकें, कादंबऱ्या व निबंध लिहिण्यास सुरवात केली. नाटककार या नात्यानें याची लोकांत जितकी प्रसिद्धि आहे त्यापेक्षां निबंधकार या नात्यानें अधिक प्रसिद्धि आहे.

**लॉर्ड लिटनच्या**[1] ' द्रव्य ' या नाटकांतील एका पात्राची आठवण होते. त्या पात्रानें असे उद्गार काढिले आहेत कीं, ' मी जर टोपीविक्या झालों असतों तर या जगांत डोक्यावांचूनच मनुष्यें जन्माला आलीं असतीं ! ' पण अशीं जीं अभागी पात्रें नाटककार आपल्या नाटकांत घालितात तीं बहुतकरून ज्या मनुष्यांना स्वतःच्या चुकानें, मूर्खपणानें, भलताच धंदा स्वीकारिल्यानें, दीर्घ परिश्रमाच्या अभावामुळें व अंगीं आत्मसंयमन करण्याची शक्ति नसल्यामुळें अपजय येतो त्यांच्याच उदाहरणांवरून घालितात. वास्तविक पाहिलें तर प्रत्येक मनुष्याला जय मिळविण्याची संधि येत असते; पण ती साधून तिचा योग्य उपयोग करून घेतला तरच जय येतो नाहींतर अपयश अगदीं ठेवल्यासारखें !

७ पण असा समज सर्व लोकांचा असतो कोठें ? इंग्लंडांत **एल्डन**[2] ह्मणून एक प्रख्यात गृहस्थ होऊन गेला. त्याचें असें ह्मणणें असे कीं, ' मजसारख्या दुसऱ्या मनुष्याकडे मी पाहिलें व माझ्या अंगीं कोणकोणते गुण आहेत हें मी लक्ष्यांत आणिलें ह्मणजे मला असें आश्चर्य वाटतें कीं, मी ज्या अधिकारावर हल्लीं आहे तो अधिकार मला मिळा-

१ **लॉर्ड लिटनः**—हा इ० स० १८०५ या वर्षी इंग्लंडांत जन्मला. हा २१ वर्षांचा झाल्यानंतर यानें नाटकें लिहिण्यास सुरवात केली. याचीं ५१६ उत्कृष्ट नाटकें आहेत. याला कविताही करितां येत असत. याचीं ३१४ उत्तम काव्यें आहेत. याची दोन वेळ पार्लमेंटामध्यें निवड झाली होती. हा उत्तम वक्ता नव्हता; तरी लोकांच्या मनावर ठसा उमटेल इतकें जोरदार भाषण याला करितां येत असे.

२ **एल्डनः**—जन्म इ० स० १७५१. मृत्यु १८३८. १७८३ या वर्षी पार्लमेंटाचा सभासद झाला. १७८८ या वर्षी सॉलिसिटर-जनरल झाला. १७९३ मध्यें अटर्नी-जनरल झाला. १७९९ या वर्षी त्याला चीफ जस्टिसची जागा मिळाली. १८०१ मध्यें लॉर्ड चॅन्सलरची जागा मिळाली व १८२१ मध्यें अर्ल ऑफ् एल्डन ही पदवी मिळाली.

ला कसा? याचें खरें कारण ह्मटलें ह्मणजे माझें सुदैव असें मी समजतों.' एल्डनचा हा तर्क किती चुकीचा आहे! त्याला जो मोठा अधिकार मिळाला होता तो त्याच्या सुदैवानें मिळाला नसून त्याच्या अंगीं मोठी योग्यता असल्यामुळें व तो सतत उद्योग आणि दीर्घ परिश्रम हीं करण्यास कधीं मागें पुढें पहात नसल्यामुळेंच मिळाला होता.

८ आतां कोणी असें ह्मणेल कीं, **शिवाजी**, **बाजीरावें**, **शिकंदर**,

---

१ **शिवाजीः**—जन्म इ० स० १६२७. मृत्यु १६८०. याला लहानपणीं याची आई जिजाबाई व गुरु दादोजी कोंडदेव यांच्या देखरेखीखालीं राज्यविद्येचें व सदाचरणाचें शिक्षण मिळालें. याला लिहितां वाचतां मुळींच येत नव्हतें. इ० स० १६७४ या वर्षी, स्वपराक्रमानें हिंदुपातशाही स्थापन करून, यानें रायगडीं आपणास राज्याभिषेक करून घेतला. यानें यवनांस जर्जर करून खुद्द दिल्लीपतीस अगदीं जेरीस आणिलें. यानें अष्टप्रधानांची स्थापना करून त्यांच्या साहाय्यानें आपला राज्यकारभार उत्तम रीतीनें चालविला. प्रसिद्ध साधु रामदास यांचा त्याजवर पूर्ण अनुग्रह होता. कित्येक हिंदुलोक शिवाजीला शिवाचा अवतार समजून त्याची भक्ति करितात.

२ **बाजीरावः**—जन्म इ० स० १६९५. मृत्यु १७४०. हा ब्राह्मण वीर श्रीमंत थोरले शाहू महाराज यांचेवेळीं उदयास आला. याला पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्यावर यानें दिल्ली अटकेपर्यंत मराठी राज्याचा झेंडा फडकाविला. याला शिद्दी व मोंगल लोक थरथरां कांपत असत. हा फार शूर असून राज्यकारभारांत मोठा पटाईत होता.

३ **शिकंदरः**—जन्म इ० स० पूर्वी ३५६. मृत्यु इ० स० पूर्वी ३२३. हा २० व्या वर्षी म्यासेडोन ( ग्रीस ) येथील आपल्या बापाच्या गादीवर बसला. याचा गुरु आरिस्टॉटल. त्याच्या शिक्षणानें शिकंदराच्या अंगीं शौर्यसाहसादि अनेक गुण आले होते. यानें ग्रीस, इराण, इजिप्त वगैरे अनेक देश जिंकून संपूर्ण युरोपखंडावर आपला दरारा बसविला होता. यानें इ० स० पूर्वी ३२७ या वर्षी हिंदुस्थानावर स्वारी करून प्रख्यात पोरस राजा याचा पराभव केला व सिंध आणि पंजाब यांतील कै-

( पुढील पृष्ठ पहा. )

सिसरो, सलो यां सारख्या भाग्यशाली व विजयी मनुष्यांचा मुद्धां दैवावर विश्वास होता, मग दैवाधीन कांहीं नाहीं असें कसें ह्मणतां ये-ईल? वरील गृहस्थांचा दैवावर विश्वास होता हें खरें; पण त्यांच्या बुद्धीसारखी बुद्धि, धैर्यासारखें धैर्य किंवा वर्तनासारखें वर्तन फार थो-ड्यांचें सांपडेल! त्यांचा दैवावरील विश्वास असून नसून सारखाच हो-ता. उद्योग करण्याचा त्यांनीं कधींही मागें पुढें पाहिलें नाहीं किंवा प्रयत्न करण्याचें त्यांनीं कधींही सोडिलें नाहीं. मग त्यांच्या श्रमाचें फळ त्यांना मिळालें हें रास्तच झालें. नुसतें दैव काय करणार आहे?

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

क प्रांत जिंकिले. विद्या व कला याची त्याला चांगली अभिरुचि होती व मोठमोठे कवि आणि तत्ववेत्ते यांना तो नेहमीं आपल्या जवळ बाळगी. याला होमरचें 'इ-लिअड' वाचण्याचा मोठा नाद असे व त्यांतील शूर नायकाच्या पराक्रमाप्रमाणें आपल्या अंगीं पराक्रम यावा असें त्याला वाटे.

१ **सिसरो:**—हा प्रख्यात रोमनवक्ता होता. जन्म इ० स० पूर्वी १०६. मृत्यु इ० स० पूर्वी ४३. हा २६ वर्षांचा झाल्यानंतर वकिली करूं लागला. पुढें १७ वर्षा-नीं हा रोमचा कॉन्सल झाला. सीझर आणि पॉंपी यांच्या भाडणांत प्रथमतः यानें पॉंपीचा पक्ष स्वीकारिला होता. पण पुन्हां लवकर याची व सीझरची मैत्री जुळली. लष्करी कवाइत, कायदा व तत्वज्ञान या तीन्ही गोष्टींचें याला चांगलें शिक्षण मिळालें होतें. यानें पुष्कळ दिवस वक्तृत्वकलेचा अभ्यास करून पुढें मोठा लौकिक संपादिला. यानें वक्तृत्व, तत्वज्ञान व नीतिशास्त्र या विषयांवर अनेक लहान मोठे ग्रंथ लिहि-ले आहेत.

२ **सला:**—रोमचा डिक्टेटर. जन्म इ० स० पूर्वी १३८. मृत्यु इ० स० पूर्वी ७८. हा ५० वर्षांचा झाल्यानंतर रोमच्या लोकांनीं याला कॉन्सल नेमून पुष्कळ से-न्यानिशीं ग्रीस देशावर स्वारी करण्यास पाठविलें या स्वारींत त्याला जय आला. यानें रोमच्या राज्यपद्धतीसंबंधीं, धार्मिक संस्थासंबंधीं, न्यायदानासंबंधीं व नैतिक सुधारणासंबंधीं अनेक कायदे केले आहेत. यानें ग्रिक व रोमन विद्यांचा चांगला अ-भ्यास केला होता.

तें असून नसून सारखेंच आहे असें ह्मटलें तरी चालेल. प्रयत्न हा केलाच पाहिजे. मग दैव हें नांव काढलें तर शोभेल.

९ बेकन[१] एवढा मोठा तत्वज्ञानी असून त्यानें सुद्धां 'आकस्मिक गोष्टी व प्रासंगिक स्थिति हीं मनुष्याच्या जयापजयाला बरीच मदत कारितात' असें ह्मटलें आहे. तथापि, त्यानें सुद्धां असें कबूल केलें असतें कीं, आकस्मिक गोष्टी व प्रासंगिक स्थिति यांना ताब्यांत ठेवण्याची व त्यांच्याकडून हवीं तीं कामें करून घेण्याची शक्ति मानवी बुद्धीला आहे. शाहणा व मूर्ख यांमध्यें हेंच अंतर आहे कीं, पहिला आलेल्या संधीचाच आपल्याला पाहिजे तसा उपयोग करून घेतो व दुसरा तिचा उपयोग न करितां ती व्यर्थ घालवितो.

१० एका अमेरिकन गृहस्थानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, 'कोणतेही दहा लोक एखाद्या कामांत दैवाचा संबंध असतो असें ह्मणतील तर त्यांपैकीं नऊ तरी आळसी, दुर्मुख आणि रंजिस असे असले पाहिजेत.' खरें आहे. ज्याचा सगळा भरंवसा दैवावर, त्याला हात असून ते नसल्या सारखेच आहेत, त्याला स्वातंत्र्य असून पारतंत्र्य भोगावें लागतें व बुद्धि असून पशुप्रमाणें आचरण करावें लागतें.

११ मनुष्यानें योग्य काम योग्य वेळीं हातीं घेऊन तें उत्तम रीतीनें बजाविलें कीं, त्याला हटकून यश आलें ह्मणून समजावें. त्याचप्रमाणें

---

१ **बेकनः**—हा इ० स० १५६१ या वर्षी इंग्लंडांत जन्मला. याच्या कीर्तीस मुख्य कारण याचें तत्वज्ञान. यानें विचार करण्याची एक नवीनच पद्धत प्रचारांत आणिली व तिच्यायोगानें ज्ञानाची वृद्धि फार झाली. याला 'अर्वाचीन तत्वज्ञानाचा जनिता' असें ह्मणतात. हा एवढा मोठा तत्वज्ञानी होता, पण जबरदस्त लांचखाऊ आणि अत्यंत कृतघ्न होता. पहिल्या गुणाबद्दल लोक याची जितकी प्रशंसा करितात तितकीच दुसऱ्या अवगुणाबद्दल त्याची निंदा करितात. हा इ० स० १६२६ या वर्षी मरण पावला.

परिस्थिति कसलीही असली तरी तिजपासून कोणत्याही प्रकारचा अपाय होणार नाहीं असें समजून त्यानें सरळ मार्गानें सतत उद्योग केला पाहिजे. परिस्थिति परिस्थिति म्हणजे काय? जो म्हणून चाणाक्ष, मेहनती व दीर्घोद्योगी आहे, तो परिस्थिति हेंच जय मिळविण्याचें साधन आहे असें समजून तिचा हवातसा उपयोग करून घेऊन शेवटीं जय मिळावितो. जलपर्यटणाला निघालें ह्मणजे खलाशांची जशी भरती, ओहटी आणि वारा यांच्याशीं गांठ पडोच पडते, तसें आयुष्यांत मनुष्याला प्रसंग, वेळ आणि परिस्थिति हीं येतातच येतात. पण खलाशी कुशल असला ह्मणजे तो जसा भरती, ओहटी आणि वारा यांचाच पाहिजे तसा उपयोग करून घेऊन शेवटीं इच्छित स्थळीं पोंचतो, तसा जो मनुष्य धाडसी, हुषार आणि दृढनिश्चयी असतो तोही प्रसंग, वेळ आणि परिस्थिति यांचेंच सहाय घेऊन आपलें काम तडीस नेतो.

१२ ज्यांना बिनचूक तर्क करितां येत नाहीं त्यांना दुसऱ्याविषयीं बरोबर मत मुळींच देतां येत नाहीं. मनुष्याचीं बाह्य स्वरूपें कशीं असतात व अंतःस्वरूपें कशीं असतात हें, ज्यांना बरोबर तर्क करितां येतो, त्यांनाच कळतें. बिनचूक तर्क करितां आल्याशिवाय मनुष्याला खरा उद्योगी कोण आहे, कोणास हटकून यश आलें पाहिजे व जगांत मानमान्यता किंवा कीर्ति मिळण्यास मनुष्याच्या अंगीं कोणकोणते गुण अवश्य असले पाहिजेत याचें ज्ञान मुळींच होणार नाहीं. बिनचूक तर्क करितां न आल्यामुळें दुसऱ्याची खरी योग्यता किती असते हें पुष्कळांना समजत नाहीं. त्यामुळें दिसतांना तरतरीत व हुषार मनुष्याला एखाद्या कामांत अपयश आलें ह्मणजे त्यांना मोठें आश्चर्य वाटतें व त्याचें कारण केवळ एक दुर्दैव असावें असा ते निरर्थक वाद करितात. वास्तविक पाहिलें तर, मनुष्याच्या अंगीं जितकी योग्यता असते त्या मानानेंच त्याला या जगांत यश येत असतें.



**श्री० पहिले बाजीराव.**

जन्म इ. स. १६९५.　　　　मृत्यु इ. स. १७४०.

( निबंधावलि. पान १३ पहा. )

आतां प्रत्येक नियमाला अपवाद हा असतोच. आणि जगाच्या आज-पर्यंतच्या इतिहासाकडे अवलोकन केलें ह्मणजे कांहीं कांहीं बुद्धिवान् व सद्गुणी लोकांनासुद्धां एखाद्या कामांत यावा तसा जय न येतां उलट संकटें व हाल हीं भोगावीं लागलीं असें दिसून येतें. तथापि, एवढ्या-वरून मुख्य नियमाला बाध येतो अशी मुळींच गोष्ट नाहीं. योग्यतेप्र-माणें फलप्राप्ति ही झालीच पाहिजे.

१३ अंगीं पुष्कळ योग्यता असून ज्यांची या जगांत मुळींच चहा झाली नाहीं अशीं माणसें आमच्या वाचकांना किती सांपडतील? कदा-चित् ते असें ह्मणतील कीं, " कित्येकांच्या अंगीं मोठी योग्यता अ-सते; पण त्यांना भोंवतालची स्थिति अनुकूल नसल्यामुळें किंवा त्यां-च्या दैवदुर्विपाकामुळें त्यांचें तेज पडत नाहीं. नाहींतर कालिदासा[1]-

---

१ **कालिदास**:—हा संस्कृत कवि होता. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास उ-पलब्ध नसल्यामुळें हा कोणत्या काळीं होऊन गेला हें पक्कें सांगतां येत नाहीं. कोणा-च्या मतें हा इ० स० पूर्वी पहिल्या शतकांत होऊन गेला व कोणाच्या मतें त्याच श-तकाच्यापुढें साहाव्या शतकांत होऊन गेला. याच्या कवितेंत श्रृंगार, करुणादि रस, कल्पनाविशालत्व, सरस व हृदयंगम वर्णनें, गंभीर आणि प्रगल्भ विचार हीं पूर्णपणें भरलीं असून उपमा देण्याची याचा हातोटी अप्रतीम असल्यामुळें लोक याला ' क-विकुलमुकुटमणी ' ही संज्ञा देतात. याचे मुख्य ग्रंथ ह्मटले ह्मणजे ' कुमारसंभव ', ' रघुवंश ', ' मेघदूत ' ' शाकुंतल नाटक ' व ' विक्रमोर्वशी नाटक ' हे होत. या-खेरीज त्यानें ' ऋतुसंहार, ' ' श्रुतबोध ', ' श्रृंगार तिलक, ' ' श्रृंगाररसाष्टक ' असे लहान लहान ४ ग्रंथ लिहिले आहेत. ' मालविकाग्निमित्र ' या नांवाचें एक नाटक याच्या नांवानें प्रसिद्ध आहे. पण तें खुद्द कालिदासानें लिहिलें नसावें असा पंडितांचा तर्क आहे. याखेरीज लहान मोठे सुमारें १५ ग्रंथ याच्या नांवावर चालत आले आहेत. पण त्यासंबंधी पंडिताचा वरीलच तर्क आहे.

सारखे कवि किंवा नानाफडणविसासारखे[1] मुत्सद्दीमुद्धां ते निपजले असते. " पण हें त्यांचें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. परिस्थिति कितीही अनुकूल असली किंवा सुदैवाची केवढीही कृपा असली तरी पाहिजे त्या मनुष्याला कालिदास किंवा नानाफडणविस होतां येईल काय! अंगांत योग्यताच जर नाहीं तर परिस्थितीवर किंवा दैवावर उगीच टोपर ठेऊन काय उपयोग? खरी योग्यता ज्याच्या अंगांत आहे तो परिस्थितीला न जुमानतां किंवा दैवाविषयीं विचार न करितां आपल्या इच्छेप्रमाणें आपलें वर्तन ठेऊन कोणतेंही काम हां हां म्हण-

१ **नानाफडणविसः**—जन्म इ० स० १७४१. मृत्यु इ० स० १८००. हा श्री० नानासाहेब पेशवे व श्री० थोरले माधवराव यांच्या कारकीर्दींत फडणिसाचें काम पाहत होता. पुढें श्री० नारायणराव पेशवे यांचा वध झाल्यावर पुण्यांत जीं राज्यकारस्थानें सुरू झालीं त्यांत त्यानें पुढारीपणा स्वीकारून रघुनाथराव दादासाहेब यांजबरोबर वैर बांधिलें व श्री० सवाई माधवराव यांना पेशवाईचीं वस्त्रें देऊन त्यांचा राज्यकारभार आपण उत्तम रीतीनें चालविला. हा शूर मुळींच नव्हता. तथापि राज्यकारभारामध्यें इतका वाकबगार होता कीं, शिंदे, होळकर, गायकवाड हे त्याच्या पूर्ण कह्यांत असून निझाम, हैदर, फ्रेंच व इंग्लिश हे देखिल त्याला नमून वागत. श्री० सवाई माधवराव यांच्या मृत्युनंतर पुण्याच्या दरबारांत बाचाबाची होऊन नानास बापू गोखल्यासारखे अनेक घरभेदी शत्रु उत्पन्न झाले. पण नानानें त्या सर्वांसही दाद दिली नाहीं. नानाच्या अद्वितीय मुत्सद्दीपणामुळें मराठ्यांचें वैभव, पराक्रम व सत्ता हीं कळसास पोंचलीं होतीं. नानाच्या पश्चात् या सर्वांची अगदीं राखरांगोळी झाली ! ब्राह्मणाचें शाहणपण व मुत्सद्दीपणा हीं नानाबरोबरच लयास गेलीं असे अनेक एतद्देशीय व इंग्लिश इतिहासकारांनीं उद्गार काढिले आहेत.

तां तडीस नेईल. फार तर काय, ब्राडलांसारखीं जीं माणसें असतील तीं प्रत्यक्ष परिस्थितीला किंवा दैवालासुद्धां आपल्यासारखें करून घेतील. म्हणूनच 'दैवन देयमिति का पुरुषा वदंति' म्हणजे हलके लोकच कोणतीही गोष्ट दैवाधीन असते असें म्हणतात असें जें एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. 'दैव काय करील तें करील' असें म्हणून जे लोक स्वस्थ बसतात त्यांना सदासर्वदां आळस, निरुद्योग व निरुत्साह यांनीं पछाडिलें असतें व नेहमीं अपयश एकसारखें पाठीमागें लागलें असतें. करितां आपलें बरें वाईट करणें हें दैवाच्या स्वाधीन मुळींच नाहीं असें समजून मनुष्यानें केवळ एक प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे सिद्धि पुढें तयार असते. योगवासिष्टांत म्हटलेंच आहे कीं:—

पौरुषा दृश्यते सिद्धिः पौरुषाद्धीमतां क्रमः ॥
दैवमाश्वासनामात्रं दुःखे पेलवबुद्धिषु ॥ १ ॥

भावार्थः—प्रयत्नानें सिद्धि व बुद्धि प्राप्त होते. आणि दैवाचा

---

१ **चार्लस ब्राडलाः**—हे इंग्लिश गृहस्थ होते. यांचा जन्म इ० स० १८३३ या वर्षी झाला. यांची घरची अगदीं गरीबी असल्यामुळें प्रथमतः हे एका वकिलाच्या घरांत शिपाई होऊन राहिले होते. पुढें स्वतःच्या उद्योगानें व दीर्घ परिश्रमानें विद्या संपादन करून यांनीं लोकांचें धुरीणत्व पतकरिलें व इ० स० १८८० या वर्षी नॉर्थांपट्न शहराच्यावतीनें पार्लमेंटाचे सभासद झाले. ऐर्लंडांतील विपत्तिग्रस्त लोकांना सुख व्हावें म्हणून यांनीं पुष्कळ प्रयत्न केले. यांनीं स्पेन देशांत व अमेरिकेंत राजकीय व धार्मिक विषयावर अनेक व्याख्यानें दिलीं. हे इ० स० १८९१ च्या जानेवारी महिन्याच्या ३० व्या तारखेस मरण पावले. यांना हिंदुस्थानची फार कळकळ होती. मरणापूर्वी ४।५ वर्षें यांनीं या देशाच्यावतीनें पार्लमेंटांत व विलायतेंत पुष्कळ खटपट केली. इ० स० १८८९ या वर्षी मुंबईस जी ५ वी राष्ट्रीय सभा भरली होती त्या सभेस विलायतेहून हे मुद्दाम आले होते.

सारखे कवि किंवा नानाफडणविसासारखे[1] मुत्सद्दीमुद्धां ते निपजले असते." पण हें त्यांचें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. परिस्थिति कितीही अनुकूल असली किंवा सुदैवाची केवढीही कृपा असली तरी पाहिजे त्या मनुष्याला **कालिदास** किंवा **नानाफडणविस** होतां येईल काय? अंगांत योग्यताच जर नाहीं तर परिस्थितीवर किंवा दैवावर उगीच टोपर ठेऊन काय उपयोग? खरी योग्यता ज्याच्या अंगांत आहे तो परिस्थितीला न जुमानतां किंवा दैवाविषयीं विचार न करितां आपल्या इच्छेप्रमाणें आपलें वर्तन ठेऊन कोणतेंही काम हां हां म्हण-

---

१ **नानाफडणविसः**—जन्म इ० स० १७४१. मृत्यु इ० स० १८००. हा श्री० नानासाहेब पेशवे व श्री० थोरले माधवराव यांच्या कारकीर्दींत फडणिसाचें काम पाहत होता. पुढें श्री० नारायणराव पेशवे यांचा वध झाल्यावर पुण्यांत जीं राज्यकारस्थानें सुरू झालीं त्यांत त्यानें पुढारीपणा स्वीकारून रघुनाथराव दादासाहेब यांजबरोबर वैर बांधिलें व श्री० सवाई माधवराव यांना पेशवाईचीं वस्त्रें देऊन त्यांचा राज्यकारभार आपण उत्तम रीतीनें चालविला. हा शूर मुळींच नव्हता. तथापि राज्यकारभारामध्यें इतका वाकबगार होता कीं, शिंदे, होळकर, गायकवाड हे त्याच्या पूर्ण कह्यांत असून निझाम, हैदर, फ्रेंच व इंग्लिश हे देखिल त्याला नमून वागत. श्री० सवाई माधवराव यांच्या मृत्युनंतर पुण्याच्या दरबारांत बाचाबाची होऊन नानास बापू गोखल्यासारखे अनेक घरभेदी शत्रु उत्पन्न झाले. पण नानानें त्या सर्वांसही दाद दिली नाहीं. नानाच्या अद्वितीय मुत्सद्दीपणामुळें मराठ्यांचें वैभव, पराक्रम व सत्ता हीं कळसास पोंचलीं होतीं. नानाच्या पश्चात् या सर्वांचीं अगदीं राखरांगोळी झाली! ब्राह्मणाचें शाहणपण व मुत्सद्दीपणा हीं नानाबरोबरच लयास गेलीं असे अनेक एतद्देशीय व इंग्लिश इतिहासकारांनीं उद्गार काढिले आहेत.

तां तडीस नेईल. फार तर काय, ब्राडलासारखीं जीं माणसें असतील तीं प्रत्यक्ष परिस्थितीला किंवा दैवालासुद्धां आपल्यासारखें करून घेतील. म्हणूनच 'दैवन देयमिति का पुरुषा वदंति' म्हणजे हलके लोकच कोणतीही गोष्ट दैवाधीन असते असें म्हणतात असें जें एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. 'दैव काय करील तें करील' असें म्हणून जे लोक स्वस्थ बसतात त्यांना सदासर्वदां आळस, निरुद्योग व निरुत्साह यांनीं पछाडिलें असतें व नेहमीं अपयश एकसारखें पाठीमागें लागलें असतें. करितां आपलें बरें वाईट करणें हें दैवाच्या स्वाधीन मुळींच नाहीं असें समजून मनुष्यानें केवळ एक प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे सिद्धि पुढें तयार असते. योगवासिष्टांत म्हटलेंच आहे कीं;—

पौरुषा दृश्यते सिद्धिः पौरुषाद्धीमतां क्रमः ॥
दैवमाश्वासनामात्रं दुःखे पेलवबुद्धिषु ॥ १ ॥

भावार्थः—प्रयत्नानें सिद्धि व बुद्धि प्राप्त होते. आणि दैवाचा

---

१ **चार्लस ब्राडलाः**—हे इंग्लिश गृहस्थ होते. यांचा जन्म इ० स० १८३३ या वर्षी झाला. यांची घरची अगदीं गरीबी असल्यामुळें प्रथमतः हे एका वकिलाच्या घरांत शिपाई होऊन राहिले होते. पुढें स्वतःच्या उद्योगानें व दीर्घ परिश्रमानें विद्या संपादन करून यांनीं लोकांचें धुरीणत्व पतकरिलें व इ० स० १८८० या वर्षी नॉर्थापटन शहराच्यावतीनें पार्लमेंटाचे सभासद झाले. ऐर्लंडांतील विपत्तिग्रस्त लोकांना सुख व्हावें ह्मणून यांनीं पुष्कळ प्रयत्न केले. यांनीं स्पेन देशांत व अमेरिकेंत राजकीय व धार्मिक विषयावर अनेक व्याख्यानें दिलीं. हे इ० स० १८९१ च्या जानेवारी महिन्याच्या ३० व्या तारखेस मरण पावले. यांना हिंदुस्थानची फार कळकळ होती. मरणापूर्वी ४।५ वर्षे यांनीं या देशाच्यावतीनें पार्लमेंटांत व विलायतेंत पुष्कळ खटपट केली. इ० स० १८८९ या वर्षी मुंबईस जी ५ वी राष्ट्रीय सभा भरली होती त्या सभेस विलायतेहून हे मुद्दाम आले होते.

आश्रय अथवा त्यावर विश्वास ठेवल्यानें दुःख मिळतें व बुद्धि नष्ट होते.

यत्नवद्भिर्दृढाभ्यासैः प्रज्ञोत्साह समन्वितैः ॥
मेरवोऽपि निगीर्यन्ते कैव प्राक्पौरुषे कथा ॥ २ ॥

भावार्थः—यत्न करणारे, दृढाभ्यासी आणि प्रज्ञोत्साहांनीं युक्त अशा पुरुषाकडून एवढा मोठा जो मेरु पर्वत तोसुद्धां गिळला जातो तर या प्राक्तनदोषाची काय कथा!

कालविद्भिर्विनिर्णीता यस्यास्ति चिरजीविता ॥
सचेज्जीवति संछिन्न शिरास्तद्दैवमुत्तमम् ॥ ३ ॥
कालविद्भिर्विनिर्णीतं पाण्डित्यं यस्य राघव ॥
अनध्यापित एवासौ तज्ज्ञश्चेद्दैवमुत्तमम् ॥ ४ ॥

भावार्थः—रामचंद्रा, दैवज्ञांनीं ज्या पुरुषास 'तूं चिरजीव होशील' असें सांगितलें आहे त्याचा शिरच्छेद केला असतां जर तो जिवंत राहिला तर मात्र खरें दैव; किंवा दैवज्ञांनीं ज्याला सांगितलें आहे कीं, 'तूं पंडित होशील' अशा पुरुषाकडून अध्ययन न करवितां जर तो पंडित झाला तरच खरें दैव.

१४ दैवाप्रमाणेंच भुतेंखेतें व शकुन याविषयींही कित्येकांचा तर्क अगदीं चुकीचा असतो. 'अमक्या ठिकाणीं मी थोरला जाळ पाहिला. अमक्या ठिकाणीं मी लहान गाढवाचें मोठें गाढव झालेलें पाहिलें. अमक्या झाडावर मी अकाळ विकाळ ब्रह्मराक्षस पाहिला. अमक्या चवाठ्यावर अमक्या रात्रीं भयंकर रूप धारण करणारी एक स्त्री गुप्त झालेली मी पाहिली' वगैरे अनेक तऱ्हेचे उद्गार अनेकांच्या तोंडून तुह्मीं ऐकले असतील. पण ते सर्व कशाचे प्रकार आहेत याचा तुह्मी कधीं विचार केला आहे काय?



चार्लस ब्राडला.

जन्म. इ. स. १८३३. मृत्यु. इ. स. १८९१.

१९ भुतांविषयीं वास्तविक पाहूं गेलें तर असा प्रकार आहे कीं, ज्याला कित्येक लोक भुताचे चमत्कार ह्मणून ह्मणतात ते निव्वळ भ्रांतीचे प्रकार असतात ' मनुष्याच्या मनाचा हा धर्मच आहे कीं, डोळ्यांस जसे नानाप्रकारचे आभास होतात त्याचप्रमाणें त्यासही व्हावे. ह्मणजे डोळ्यांस जसे सूर्यबिंबाचें संध्यासमयीं प्रसरण व आरक्तता, अरण्यांतील मृगजल वगैरे अनेक आभास होतात त्याचप्रमाणें मनासही होत असतें. हे भ्रम विचाराच्या योगानें मनुष्यास जसजसें यथार्थ ज्ञान प्राप्त होतें तसतसे नाहींसे होत जातात. ' ज्यानें अनेक गोष्टींविषयीं यथार्थ ज्ञान संपादन केलें आहे व ज्याला विचार करण्याची चांगली शक्ति आली आहे तो वरील चमत्कारांचें कार्यकारण शोधून काढल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. पडछाया, प्रतिध्वनि, प्रकाशाचे गुणधर्म इत्यादिकांविषयीं बरोबर ज्ञान नसल्यामुळें त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या चमत्कारांनाच कित्येक लोक भुतेंखेतें समजतात व त्यांची भीति बाळगितात **रामदासस्वामींनीं**[1] म्हटलेंच आहे कीं, :—

---

१ **रामदासस्वामीः**—हे जातीचे ब्राह्मण. यांचा जन्म इ. स. १६०८ या वर्षी जांबगांवीं झाला. यांच्या बापाचें नांव सूर्योपंत व आईचें नांव राणूबाई. यांचें पहिलें नांव नारायण असें होतें. पण पुढें हे रामाची भक्ति करूं लागले ह्मणून यांना रामदास असें नांव पडलें. हे लहान असतांनाच विरक्त होऊन नाशिक क्षेत्रीं पंचवटींत जाऊन राहिले होते. पुढें सातारा जिल्ह्यांत चाफळ ह्मणून गांव आहे तेथें ते येऊन राहिले. यांचे अनेक शिष्य होते. त्यांत शिवाजी राजा हा एक होता. त्यानें एकदां स्वामींस सगळें राज्य अर्पण केलें. पण निरपेक्षबुद्धीनें त्यांनीं तें त्यास परत दिलें. हे कांहीं दिवस परळी ( त्यालाच सज्जनगड असें नांव पडलें आहे ) नांवाच्या किल्ल्यांत राहत असत. याच ठिकाणीं ते इ. स. १६८१ या वर्षी समाधिस्थ झाले. यांनीं दासबोध, स्फुट अभंग, मनाचे श्लोक हे ग्रंथ लिहिले आहेत.

### अभंग

१.

वाजे पाऊल आपलें । ह्मणे मागें कोण आलें ॥
कोण धांवतसे आड । पाहो जातां झालें झाड ॥
भावितसे अभ्यंतरीं । कोण चाले बरोबरी ॥
शब्द पडसाद ऊठला । ह्मणे कोण रे बोलिला ॥
रामीं रामदास म्हणे । संशयाचीं हीं लक्षणें ॥ १ ॥

२

कांहीं दिसे अकस्मात । तेथें वाटे आलें भूत ॥
वायां पडावें संदेहीं । मुळीं तेथें कांहीं नाहीं ॥
झाड झुडुप देखिलें । जिवीं वाटे कोण आलें ॥
रामदास सांगे खुण । भितो आपणा आपण ॥ २ ॥

३

छाया देखुनी आपली । शंका अंतरीं वाटली ॥
ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥
मुखें बोलतां उत्तर । तेथें झालें प्रत्युत्तर ॥
डोळां घालितां आंघोळी । एकाचीं तीं दोन झालीं ॥
पोटीं आपण कल्पिलें । तेंचि आलेंसें वाटलें ॥
दास म्हणे हे उपाधी । शंका धरितां अधिक बाधी ॥ ३ ॥

१६ कित्येकांना अशी शंका येईल कीं, भुतेंखेतें हा जर निवळ भ्रम आहे तर अमक्या अमक्यांनीं स्मशानांत जाऊन मंत्रसामर्थ्यानें पिशाच्यास वश करून घेतलें आहे व त्यापासून ते लोकांना कसलें पाहिजे तसले पदार्थ काढून दाखवितात व त्यापासून पाहिजे तितकें द्रव्यही संपादन करितात असें जें ह्मणतात तें अगदीं खोटें आहे काय? अथवा अमक्या अमक्यांना पिशाच्य साध्य झाल्यामुळें ते कोणाला काय पाहिजे तें दाखवितात किंवा कोणाला कसली पाहिजे तसली पीडा करितात असें जें सांगतात तेंही अगदीं खोटें आहे काय? होय.

अगदीं खोटें आहे. पिशाच्याच्या साहायानें जर पाहिजे तो पदार्थ व पाहिजे तितकी संपत्ति मिळवितां येते तर ज्यांना ज्यांना पिशाच्य साध्य झालें आहे असें ह्मणतात ते सर्वच दरिद्री कां असते? एखादा गारुडी जसा हातचलाखीनें लोकांना नानाप्रकारचे जिन्नस काढून दाखवितो तद्वत्च यांची क्रिया असते. गारुड्यांत आणि यांच्यांत फरक एवढाच कीं, गारुडी अगदींच दरिद्री असल्यामुळें त्याला दारोदार भीक मागत फिरावें लागतें; यांची थोडी चांगली स्थिति असल्यामुळें यांना तसें करावें लागत नाहीं. बरें, पिशाच्याच्या सहायानें जर त्यांना काय पाहिजे तें करितां येतें तर क्रूर श्वापदांचा एकदम वध करणें, बलाढ्य शत्रूचा इच्छेसरशीं पाडाव करणें, राज्याची एकदम उलथापालथ करणें, देशाचें नष्ट झालेलें स्वातंत्र्य एकदम परत मिळविणें, निमिषार्धात एकंदर लोकांचें कल्याण करणें याचें जगाच्या अलीकडील इतिहासांत एक तरी उदाहरण सांपडावयाचें होतें! आणि ज्या अर्थी तसें उदाहरण सांपडत नाहीं त्याअर्थी पिशाच्य अनुकूल आहे या समजावर अज्ञ लोकांच्या पोटांत भीति उत्पन्न करून त्यांवर आपला पगडा बसवावा यापलीकडे त्यांचा दुसरा कोणताही हेतु नसतो असें स्पष्ट ह्मणावें लागतें.

१७ भुताखेतांविषयीं कित्येकांचा तर्क जसा चुकीचा असतो तसाच शकुनाविषयींही असतो. आमच्या देशांत शकुनांचे अनेक प्रकार आहेत. मांजर आडवें जाणें, विधवेचें दर्शन होणें, पोराचें शिंकणें, नेत्रस्फुरण पावणें, घोड्याचें फुरफुरणें, चापपक्ष्याचें उडणें, घुबड, पिंगळा वगैरे पक्ष्यांचें ओरडणें या सर्वांचा शकुनांत समावेश होतो. आतां असल्या शकुनांवर विश्वास ठेवणें किती समंजसपणाचें आहे याविषयीं **शास्त्रीबोवांनीं** आपल्या निबंधमालेंत मांजरांचें उदाहरण पुढें घेऊन

१ **विष्णुशास्त्री चिपळूणकरः**—जन्म इ. स. १८५०. मृत्यु इ. स. १८८२. सुप्रसिद्ध कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचें हे चिरंजीव. इ. स. १८७२ या

( पुढील पृष्ठ पहा. )

जें विवेचन केलें आहे त्यांतील एक उतारा येथें दिला असतां वाक्यकांची खात्री होईल असें आह्मांस वाटतें. ते ह्मणतातः--

" कांहीं कामास निघालें असतां मांजर आडवें गेलें आणि तें काम हटकुन झालें नाहीं असें कोणाच्या तरी अनुभवास आजपर्यंत आलें असेल काय? कार्याचें स्वरूप, कर्त्याचें शहाणपण व हिंमत, साधनांचा योग्यायोग्यपणा इत्यादिकांवर हातीं घेतलेल्या कामांत यश अगर अपयश येणें हें सदासर्वदा अवलंबून असतें. त्यांत विचाऱ्या मांजराच्या जाण्याचा कांहींच संबंध नसतो. दुसरे असे लक्षावधी व्यापार त्यावेळेस सृष्टींत चालले असतात त्याप्रमाणेंच मांजराचें रस्ता ओलांडून जाणें हा एक होय. मग होणाऱ्या कार्याची असिद्धि ही त्या बिचाऱ्या एकट्यावरच कां लोटावी? दिसण्यांत परस्पर असंबद्ध असणाऱ्या लक्षावधि कार्यांचा जर कांहीं अपूर्व संबंध असेलच, तर वाटेनें निघालेल्या मनुष्याचें काम न होणें याचा संबंध केवळ खुषीखातर इकडून तिकडे जाणाऱ्या मांजरावर जितका येईल तितकाच कोट्यावधि दुसऱ्या गोष्टींवरही येईल. समजा कीं, पुणें मुक्कामीं कोणी गोसाजी तिमाजीस भेट-

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

र्षीं यांची बी. ए. ची परिक्षा उतरली. हे कांहीं दिवस पुण्यास व कांहीं दिवस रत्नागिरीस सरकारी शाळेंत शिक्षकाचें काम करीत होते. १८७४ सालीं यांनीं ' निबंधमाला ' नांवाचें मासिक पुस्तक सुरू केलें. त्यांत सरकारच्या व सरकारच्या ज्ञातिबांधवाच्या दोषावर मधुन मधुन विषयानुरोधानें खरमरीत टीका येऊं लागल्यामुळें त्यांच्या वरिष्ठांचा त्यांच्यावर बराच रोष झाला. पुढें स्वतंत्र धंदे करावेत अशी त्यांच्या मनानें उचल खाल्ल्यामुळें त्यांनीं सरकारी नोकरीचा एकदम राजीनामा दिला. व इ० स० १८८० या वर्षी पुण्यांत ' न्यू इंग्लिश स्कूल ' नांवाची एक खासगी शाळा घातली. पुढें लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार व्हावा व त्यांचेठायीं विचारस्वातंत्र्य यावें ह्मणून त्यांनीं ' केसरी ' व ' मराठा ' हीं दोन साप्ताहिक वर्तमानपत्रें मराठींत व इंग्रजींत सुरू केलीं. याखेरीज चित्रकला व ग्रंथसंग्रह यांना उत्तेजन मिळावें ह्मणून त्यांनीं ' चित्रशाळा ' व ' किताबखाना ' या दोन संस्था स्थापन केल्या. हे संस्कृत, मराठी व इंग्रजी या तीन्ही भाषांत प्रविण होते. यांनीं ' शालापत्रकां ' तून व ' निबंधमाले ' तून अनेक विषयांवर लहान मोठे, सुरस व चटकदार निबंध प्रसिद्ध करून मराठी भाषेवर अनंत उपकार करून ठेविले आहेत. हे स्वभावानें सुशील असून कट्टे देशाभिमानी होते.



विष्णुशास्त्री चिपळूणकर.

जन्म. इ. स. १८५०. मृत्यु. इ. स. १८८२.

ण्याकरितां गेले आणि तिमाजी भेटले नाहींत तर तें अपयश सोम्या नांवाच्या मांजरावरच कां? गोमाजींनीं त्या वेळेस पांढरें पागोटें घातलें होतें किंवा आदल्या रात्रीं ते जेवले नव्हते हेंच भेट न होण्याचें कारण कशावरून नसेल? अथवा हेंचसें काय, त्याच क्षणीं लंडन शहरांत अमुक अमुक ठिकाणीं अमुक अमुक मनुष्यास अमुक अमुक झालें तें आमच्या शकुन भोळ्या गृहस्थास कशावरून बद्धक झालें नसेल? विचारें मांजर तेवढें पुढें दिसलें त्यानेंच काय पाप केलें? बुद्धीच्या मार्गानें लक्ष्यांत न येणारा असा कांहीं विलक्षणच कार्यकारण संबंध हजारों गोष्टींत असतो असें जर एकदां ह्मटलें तर मग अमुकापासून अमुक कार्य झालें असें ह्मणण्यास जागा कोणती राहिली? निश्चित असें कांहीं नाहीं, सारेंच अनिश्चित असें जेथें झालें, तेथें एकाच व्यक्तीवर निमित्त ठेवण्यास आधार काय? ईश्वराच्या घरचें तंत्र सगळेंच जर असें तऱ्हेवाईक असेल तर मग त्यांत मनुष्यानें अमुक अमुकच नियम करून ठेवणें हा केवढा मूर्खपणा! असो, तर असे विचित्र संबंध जोडीत बसणें हा निवळ वेडेपणा आहे आणि त्यांचा खोटेपणा जर पावलो पावलीं प्रत्ययास येतो, तर त्यांवर विश्वास ठेवणें अगदीं अप्रयोजक होय."

१८ शकुन व हातीं घेतलेल्या कामांत जयापजय येणें यांत कोणत्याही तऱ्हेचा कार्यकारण संबंध नसतो. आणि जे लोक तसा संबंध असतो असा तर्क करितात त्यांना सुज्ञ लोक मूर्ख समजून त्यांची अवहेलना करितात. तुकारामानें एके ठिकाणीं म्हटलेंच आहे कीं,:--

### अभंग.

सांगो जाणति शकुन । भूतभविष्य वर्तमान ॥
त्याचा आह्मांसि कंटाळा । पाहो नावडती डोळा ॥ १ ॥

# नाचायाला येईना आंगण वांकडें.

१ नाचायाला येईना आंगण वांकडें ही ह्मण नृत्यकलेवरून प्रचारांत आली आहे. अंगीं गुण नसून जो मनुष्य काम करण्याच्या हत्यारांना किंवा साधनांना दोष देतो त्याला ही ह्मण लावितात. ज्याला चांगलें नाचतां येत नाहीं त्यानें आंगण वांकडें आहे किंवा ज्या जागेंत तो नाचतो ती जागाच ठीक नाहीं असें ह्मटलें तर तें जसें सयुक्तिक दिसणार नाहीं तसें ज्या मनुष्याच्या अंगीं कर्तबगारी नसून काम सिद्धीस जाण्याचा सगळा बोजा जो हत्यारावर टाकितो त्याचेंही ह्मणणें सयुक्तिक दिसणार नाहीं. हत्यारांना दोष देणें हें वाईट कारागिराचें लक्षण आहे. जो जड स्वभावाचा आणि मंदबुद्धीचा आहे तोच हत्यार वाईट आहे असें ह्मणेल. पण ज्याची बुद्धि तीव्र आहे आणि ज्याला काम कसें करावें हें माहित आहे तो हत्याराबद्दल मुळींच कुरकुर करणार नाहीं. जो प्रत्येक कामांत आपली थोडी बहुत मति चालवितो तो जवळ कसलेंही हत्यार असलें तरी तें चालवून आपलें काम करून टाकितो. आतां ' कांहीं सोन्याचा कांहीं सोनाराचा गुण ' या ह्मणीप्रमाणें केवळ अंगीं उत्तम कसब असलें ह्मणजे झालें असें नाहीं. तर काम करण्याचीं हत्यारेंही चांगलीं असावीं लागतात. तथापि, आपल्या जवळचीं सर्वच हत्यारें अगदीं कुचकामाचीं आहेत असें ह्मणून अमुकच हत्यार आतां आणिलें किंवा अमकींच साधनें या वेळीं हजर असतीं तर मी काय पाहिजे तें केलें असतें असें ह्मणून कोणीही स्वस्थ बसतां कामा नये. स्वस्थ बसेल त्याचें नुकसान झाल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं. जगांत आजपर्यंत जे पुरुष उदयास आले

ते साधनें नाहींत ह्मणून स्वस्थ बसले होते काय? नाहीं. तर त्यांच्याजवळ व त्यांच्या हयातींत जीं साधनें होतीं त्यांचाच उपयोग करून त्यांनीं अनेक शास्त्रांतील व अनेक कलांतील असंख्य शोध लाविले व आपल्या संततीला उद्योगाचीं, ज्ञानाचीं व सुखाचीं अगणित भांडारें खुलीं करून दिलीं!

२ हल्लीं उष्णतामापक यंत्र, वायुभारमापक यंत्र, होकायंत्र, सूक्ष्मदर्शक यंत्र, दुर्बिण इ० अनेक यंत्रें व विद्युत् आणि वाफ या दोन प्रचंड शक्ति यांचा शोध लागल्यामुळें त्यांच्या साहायानें जुन्या शास्त्रांना अधिक० भर पडत जाऊन नवीन नवीन शास्त्रेंही उदयाला येत चाललीं आहेत. पण ज्या वेळीं वरील यंत्रांपैकीं एकही यंत्र किंवा वरील शक्तींपैकीं एकही शक्ति उपलब्ध नव्हती त्यावेळीं ज्या लोकांनीं अनेक शास्त्रांतील अनेक मोठमोठे, अत्यंत महत्वाचे व सर्वव्यापी नियम शोधून काढिले त्यांच्या योग्यतेचें, प्रयत्नाचें, उत्साहाचें व थोरपणाचें वर्णन कोणी करावें!

३ जेम्स वॅट[1]नें जें पहिलें वाफेचें यंत्र तयार केलें तें एका

१ जेम्स वॅट:—हा स्कॉच यंत्रशास्त्रवेत्ता होता. जन्म इ० स० १७३६. मृत्यु इ० स० १८१९ याची बुद्धि इतकी तीव्र होती कीं, हा आठ वर्षांचा असतांना यानें भूमितींतील कांहीं बिकट प्रश्न सोडविले. हा १४ वर्षांचा झाल्यानंतर याचें मन सृष्टिशास्त्राकडे लागलें व यंत्राच्या सहायानें त्या शास्त्रांतील कित्येक प्रयोग यानें स्वतः करून पाहिले. पुढें १८ वर्षांचा झाल्यानंतर त्या शास्त्राची अधिक माहिती मिळवावी ह्मणून तो लंडन येथें आला. तेथें कांहीं दिवस राहिल्यावर तो स्वतः यंत्रें करूं लागला. यानें वाफ सोधण्याचें यंत्र, कॉपिंग प्रेस, वाफेनें चालणारें यंत्र अशीं वरींच यंत्रें नव्यानें तयार केलीं. यानें जर्मन व इटालियन भाषेचा चांगला अभ्यास केला होता.

जुनाट आणि गंजलेल्या लोखंडी नळींचेंच केलें! बेंजामिन वेस्ट[1] यानें जें पहिलें कलम तयार केलें तें मांजराच्या शेपटीच्या केसांचेंच तयार केलें! डॉक्टर वॉलेस्टेनची[2] जी रसशाला होती त्यात एक चहा घेण्याची कांचेची नळी, एक ताजवा व असिडांचा गुणधर्म दाखविणारे कांहीं कागद इतकेच जिन्नस होते! सर इझाक न्यूटननें[3] प्रकाशांत कोणकोणते रंग असतात हें एका जाड व चतुष्कोणाकृति भिंगाच्या साहाय्यानेंच शोधून काढिलें! युक्लीडनें[4] भूमितीशास्त्राचा जो भरभक्कम पाया घातला तो जमिनीवर आडव्या तिडव्या रेघा ओढून व काड्यांचीं वर्तुळें करूनच घातला!

---

१ बेंजामिन वेस्टः—हा अमेरिकन रंगारी होता. जन्म इ० स० १७३८. मृत्यु १८२०. हा २२ वर्षांचा झाल्यानंतर लंडनमध्यें आला. तेथें तिसऱ्या जॉर्जच्या आश्रयाखालीं हा ४० वर्षें होता. यानें राज्यप्रकरणासंबंधीं अनेक चित्रें काढिलीं आहेत. त्यांत 'क्रामवेल पार्लमेंटला हाकलून देत आहे' या देखाव्याचें चित्र सर्वोत्कष्ट साधलें आहे. हा लंडन येथील रॉयल अक्याडमीचा कांहीं दिवस अध्यक्ष होता.

२ डॉक्टर वॉलेस्टनः—हा इंग्लिश सृष्टिशास्त्रवेत्ता होता. जन्म इ० स० १७६६. मृत्यु इ० स० १८२८. हा कांहीं दिवस रॉयल सोसायटीचा मेंबर व सेक्रेटरी होता. यानें पॅलॅडियम व ऱ्होडियम अशा दोन नवीन धातू शोधून काढिल्या आहेत.

३ सर इझाक न्यूटनः—( पृष्ठ ४ यांतील टीप पहा. )

४ युक्लीडः—हा इ० स० पूर्वी ३ ऱ्या शतकांत अलेक्झांड्रिया ( ग्रीस ) येथें होऊन गेला. यानें भूमितिशास्त्रावर अनेक पुस्तकें लिहून आपलें नांव अजरामर करून सोडिलें. हा अलेक्झांड्रिया येथील शाळेंत कांहीं दिवस अध्यापक होता. त्या काळीं या शाळेची गणितविद्येसंबंधीं फार ख्याती होती. प्रख्यात भूगोलशास्त्रवेत्ता व गणिती जो टोलेमी तो याचा शिष्य होता.



झांशीकरीण लक्ष्मीबाई.

जन्म इ० स० १८३५ मृत्यु इ० स० १८५८

भास्कराचार्यांनीं[1] ग्रहांचीं व नक्षत्रांचीं अंतरें ज्या दुर्बिणींतून पाहिलीं ती दुर्बिण नळ्यांची व कौलांचीच होती! शिवाजी[2] राजानें जें एवढें मोठें राज्य स्थापन केलें तें डोंगरांत राहणाऱ्या गरीब व अडाणी मावळे लोकांच्याच साहायानें केलें.

४ वरील उदाहरणावरून स्पष्ट दिसून येतें कीं, मनुष्याच्या अंगीं जिज्ञासा, शोधकबुद्धि, दृढनिश्चय व ज्ञान मिळविण्याची इच्छा हीं असलीं कीं, तो आपल्यापाशीं कसलींही हत्यारें असलीं किंवा कसलींही साधनें असलीं तरी त्यांचाच उपयोग करून घेऊन इष्ट हेतु सिद्धीस नेतो. सुधारलेलीं हत्यारें किंवा सुधारलेलीं यंत्रेंच त्याला पाहिजेत अशी गोष्ट नाहीं! जो ह्मणून ज्ञानाची उगीच घमेंड मारितो व काम करावयाचें ज्याच्या अगदीं जिवावर येतें त्यालाच उत्तम उत्तम अशीं खंडीभर साधनें व चांगलीं चांगलीं अशीं पाटीभर

१ भास्कराचार्यः—हा ब्राह्मण जातीचा मोठा नामांकित ज्योतिषी होऊन गेला. याचा जन्म सह्याद्रीच्या लगत्यास असणाऱ्या जलविड गांवीं शके १०३६ मध्यें झाला. याच्या बापाचें नांव महेश्वरभट्ट. यानें आपल्या बापाजवळच सर्व अध्ययन केलें व आपल्या वयाच्या ३६ व्या वर्षीं 'सिद्धांत शिरोमणी' या नांवाचा ग्रंथ रचिला. हा त्या वेळच्या इतर ज्योतिष्याप्रमाणेंच पृथ्वी स्थिर मानून तिज सभोंवती सूर्यादि ग्रह व नक्षत्रें फिरतात असें मानणारा होता. तो पृथ्वी गोलाकार, निराधार व आकर्षणशक्तीनें युक्त आहे असें मानीत असे. पृथ्वी सपाट नाहीं अशाविषयीं यानें मनुष्यास सूर्योदय व सूर्यास्त होतो तो कधींच न होता असें दाखविलें आहे. व सपाट भासण्याचें कारण भूपारिधीचा शतांश तसाच दिसावयाचा असेंही दर्शविलें आहे. यानें सूर्यग्रहणास कारण चंद्र व चंद्रग्रहणास कारण भूच्छाया असेंही ह्मटलें आहे. याचा दुसरा ग्रंथ 'करणकुतूहल' होय.

२ शिवाजीः—( पृष्ठ १३ यांतील टीप पहा )

हत्यारें लागतील! आतां वाईट हत्यारापेक्षां चांगलीं हत्यारें चांगलींच हें कोणीही सांगेल. तथापि सर्व कांहीं चाणक्षपणा आणि हस्तकौशल्यावर अवलंबून असतें. हल्लीं चाहोंकडे रंगाऱ्यांचीं पुष्कळ घरें आहेत कीं नाहींत? त्यांच्यांत नानाप्रकारचे रंग आणि कलमें हीं असतात कीं नसतात? पण ओपी[1] ह्मणून इंग्लंडांत जो एक प्रख्यात रंगारी होऊन गेला त्याच्या रंगासारखा रंग कोणालाच करितां येत नाहीं. एकदां त्याच्या एका विद्यार्थ्यानें त्याला असें विचारिलें कीं, 'गुरुजी, तुमचा रंग इतका चांगला होतो त्याअर्थी तुह्मी त्यांत काय मिसळतां?' ओपीनें उत्तर दिलें कीं, 'अरे, मी त्यांत माझा मेंदु मिसळतो.' सारांश, नुसती उत्तम हत्यारें किंवा साधनें झालीं ह्मणजे मनुष्याचीं सर्व कामें होतात असें नाहीं. तर तीं होण्यास त्यानें आपलें डोकेंही खर्च केलें पाहिजे.

५ साधनाच्या साहित्यापेक्षां आंगच्या कर्तबगारीवर मनुष्याला केवढाले जय मिळतात याचीं आमच्या इतिहासांत अनेक उदाहरणें सांपडतात. पण विस्तारभयास्तव उत्तम अशीं दोन तीनच येथें देतों.

६ प्रथमतः झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब[2] यांचें उदाहरण घेऊं. "महाराणी लक्ष्मीबाई साहेबांनीं पराक्रम गुणांत अद्वितीय कीर्ति संपादन केली. महाराज जयाजीराव शिंदे कीं, ज्यांच्या शौर्यासंबंधानें मोठमोठे युरोपियन लोकांनीं थक्क होऊन

१ ओपीः–जन्म १७६१ मृत्यु १८०७.

२ लक्ष्मीबाईः–श्री० दुसरे बाजीराव साहेब पेशवे यांचे आश्रित मोरोपंत तांबे वांईकर यांची ही कन्या. जन्म इ० स० १८३५ मृत्यु इ० स० १८५८.

( पुढील पृष्ट पहा. )

तारीफ करावी, ज्यांच्या लढाईचा जय्यत सरंजाम अवलोकन करितांच शत्रूची गाळण व्हावी, ज्यांच्या जवळचे प्रतिकर्णासारखे रथी महारथी शूर सरदार रणांगणामध्यें दृष्टीस पडतांच विजयश्रीनें हट-

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

इचा विवाह इ० स० १८४२ या वर्षीं झांशी संस्थानचे महाराज गंगाधरराव यांशीं झाला. इच्या पोटीं एक मुलगा झाला होता. पण तो लहानपणींच मरण पावला. पुढें महाराज गंगाधरराव हे इ० स० १८५३ मध्यें मरण पावले. मरणापूर्वीं त्यांनीं एक मुलगा दत्तक घेतला होता. पण तो राज्यास वारसदार नाहीं असें समजून त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांनीं त्यांचें राज्य खालसा करून एकदम इंग्रजी राज्यास जोडिलें. आपलें राज्य आपल्या दत्तकपुत्राकडे चालावें ह्मणून लक्ष्मीबाईनें भगीरथ प्रयत्न केले पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. पुढें १८५७ या वर्षीं उत्तर हिंदुस्थानांत शिपायांचें बंड माजलें. तें फैलावत फैलावत झांशीपर्यंत येऊन थडकलें रणशूर लक्ष्मीबाईस राज्य गेल्याचा आधींच मोठा संताप आला होता. त्यांत अशी धामधुमीची वेळ आली. मग काय? वरिश्रीचें वारें एकदम आंगांत संचारून तिनें प्रळयकाळ मांडिला! झांशी संस्थानच्या पिढीजाद नोकर लोकांना तिनें परत बोलाविलें. नवीन सैन्याची हां हां ह्मणतां भरती केली. दारू गोळा सज्ज केला व एकदम झांशी संस्थान काबीज केलें! हें वर्तमान इंग्रजांस कळतांच झांशीकरीण बंडवाली आहे असा जिकडे तिकडे पुकारा झाला. इंग्रजांनीं मोठें सैन्य तयार केलें व त्यावर सेनापती सर ह्यू रोज याची नेमणूक करून त्याला झांशीकडे रवाना केलें. लक्ष्मीबाईनें इंग्रजी सैन्याबरोबर निकराची लढाई दिली. पण शेवटीं उपाय न चालल्यामुळें झांशींतून निघून ती ग्वाल्हेरकडे गेली व तेथें जयाजीराव शिंदे यांचें साहाय मागितलें. पण जयाजीराव इंग्रजांचे दोस्त पडल्यानें त्यांनीं यावेळीं तिला साहाय दिलें नाहीं. मग तिनें बंडवाल्याच्या मदतीनें ग्वाल्हेर शहर काबीज करून आपला अंमल तेथें बसविला. इतक्यांत इंग्रजांचें सैन्य तेथें येऊन थडकलें. पुढें इ० स० १८५८ च्या जून महिन्यांत निकराची लढाई झाली. तींत लक्ष्मीबाईला जबर जखम लागून ती ठार झाली. इच्या अंगीं मोठा गुण ह्मटला ह्मणजे तेजस्विता. या गुणावरून कोणी कोणी इला जोन ऑफ् आर्कची उपमा देतात.

कून वश व्हावें, त्या शिंदे सरकारास राणी साहेबांसारख्या एका अबलेनें कोणत्याही प्रकारचें ह्मणण्यासारखें साहाय नसतां आपल्या समशेरीच्या जोरावर रणविन्मुख करावें ही सामान्य गोष्ट नाहीं. यावरून एका संस्कृत कवीनें ह्मटल्या प्रमाणें:—

" क्रियासिद्धिःसत्वे भवति महतां नोपकरणे "

ह्मणजे थोरांची जी कार्यसिद्धि होत असते ती त्यांच्या पराक्रमावरून होत असते; केवळ साधनाच्या साहित्यानें कांहीं होत नाहीं हा नियम किती सत्य आहे हें चांगलें सिद्ध होतें. " *

७ दुसरीं दोन उदाहरणें रणशूर महादजी शिंदा व यशवंतराव होळकर यांचीं घेऊं. " महादजी शिंदा मुळीं लेकवळा, त्यांतून पानपतच्या पूर्णाहुतींत एक पाय गमावल्यानें लंगडशाई पदरीं आलेली. सारे भाऊ गनिमांनीं खाऊन टाकिल्यामुळें ' नास्तिबंधु समंबलम् ' यांपैकीं कांहीं अनुकूल नाहीं. याप्रमाणें सर्व तयारी असतां ' क्रियासिद्धि सत्वे भवति महतां नोपकरणे ' या कविवचनाप्रमाणें त्यानें पुढें केवढा आटोकाट विभु रचला आहे! दासीपुत्र असतां गादीचा मालक होऊन तिची इभ्रत त्यानें आतोनात वाढविली. मुसलमानांनीं पानपतानंतर उत्तर प्रांतांत पुंडावा मांडला होता तो मोडून टाकून खुद्द दिल्लीपतीला आपल्या ताब्यांत घेतलें. एवढें शूर रजपूत पण त्यांशीं सतत झगडून त्यांवर आपला शह बसविला. पुण्याच्या दरबारीं आपलें वजन वाढवून शेवटीं तर नानाफडनवीसासारख्यालाही गुंडाळण्याचा त्यानें घाट घातला. फार तर काय, पण इंग्रेजही त्याच्या पराकष्ठेचे आर्जवानें असून त्यांच्या बंगाल

* झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाई साहेब यांचें चरित्र पान ३०३.

प्रांतावरही त्यानें चौथ व सरदेशमुखी नेली होती आणि वृद्धकथे-वरून असें ऐकण्यांत आलें आहे कीं, पाटीलबोवांचा इरादा खुद्द लंडनवर भगवा झेंडा रोंविण्याचा होता!! ही एका व्यक्तीची गोष्ट झाली. दुसरी होळकरशाहींतली व्यक्ति घ्या. ते तरी दासीपुत्रच. पायानें नाहीं तर एका डोळ्यानें व्यंग. साऱ्या बंधूंची वरच्या सार-खीच किंबहुना त्याहूनही वाईट गति झालेली आणि स्वतः उधळून ना घर ना दार, ना दौलत ना सखा सोयरा अशा अत्यंत विपत्तींत रानोमाळ सुटलेले—हा पूर्वरंग; पण उत्तर रंगांतली काय मजा सां-गावी! प्रावृट् काळीं गिरिशिखरांवर वृष्टी झाली असतां हजारों ओहोळांचा एक लोट बनून जसा जबरदस्त लोंढा कडेपठारावरून व डोंगरावरून उंच्या टाकीत खालीं येतो आणि चोहोंकडे दाणादाण करून सोडतो त्याप्रमाणें पेंढार गोळा करीत करीत हळू हळू मोठा जमाव करून जेव्हां कां स्वारी पुण्यावर येऊन आदळली तेव्हां पुण्यपत्तनश्री विकंपित झाली! पुढें वानवडीच्या मैदानावर शिंद्या-च्या कंपूवर व चौदाशें तोफांवर जेव्हां यशवंतरावानें एकच गर्दी केली आणि मारीन किंवा मरेन या कृतनिश्चयानें पाश्चात्य बृहद्यं-त्राच्या धूम्रकल्लोलांशीं जेजुरीच्या भंडाऱ्याची टक्कर दिली तेव्हांची ती रणधुमाळी काय वर्णावी!" *

८ शेवटीं उपकरणापेक्षां आंगच्या सामर्थ्यावर कार्यसिद्धि केवढी अवलंबून असते याविषयीं एका संस्कृत कवीनें एके ठिकाणीं जें खुबिदार वर्णन केलें आहे तें येथें देऊन हें प्रकरण आह्मी आटोपतों:—

धनुःपौष्पं मौर्वी मधुकरमयी चंचलदृशां।
दृशां कोणो बाणः सुहृदपि जडात्मा हिमकरः॥

* निबंधमाला अंक ८०

स्वयंचैकोऽनंगः सकलभुवनं व्याकुलयति ।
क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे ॥ १ ॥

**भावार्थः**—पहा! मदनाचें धनुष्य काय? तर पुष्प. धनुष्याची दोरी तरी कशी? तर भ्रमरांची. बाण कोणता? तर चंचलनेत्री ज्या तरुणस्त्रिया त्यांच्या डोळ्यांचा कोपरा (कटाक्ष) साह्यकारी तरी कोणी मोठा समर्थ? तो तर जाडात्मा (मंदबुद्धि पक्षीं जलमय) असा चंद्र आणि स्वतः काय तो एकटा. पण इतकें असतांही हा अनंग (ज्याला शरीरही नाहीं!) सगळ्या विश्वास व्याकुल करून सोडतो. तेव्हां थोर जे आहेत त्यांची क्रियासिद्धि त्यांच्या आंगच्या सामर्थ्यावर केवळ घडते, उपकरणांत म्हणजे त्यांच्याजवळ असणाऱ्या साहित्यांत (सैन्यांत, शस्त्रांत वगैरे) काय जीव आहे!

रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्ततुरगा ।
निरालंबो मार्गश्चरणविकलःसारथिरपि ॥
रवियात्येवांतं प्रतिदिनमपारस्य नमसः ।
क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे ॥ १ ॥

**भावार्थः**—सूर्याची सामग्री पहा! रथाला चाक एक; घोडे आडनीड सात; त्यांचे दोर सुळसुळीत असे साप; मार्ग निराधार, आणि सारथि पाहिला तर व्यंग (ज्याला मांड्या नाहींत असा थोटा) पण एवढ्या अडचणी असतांही अपरंपार जें आकाश तें प्रतिदिवशीं लंघून सूर्य जातो! तेव्हां क्रियासिद्धि साधनांवर नाहीं तर मनुष्याच्या आंगच्या हिंमतीवर होत असतें!

ग्रंथरत्नाकर.



महादजी शिंदे.

जन्म इ० स० १७४३ मृत्यु इ० स० १७९४

# स्वावलंबन.

१ आयुष्यांत सुख मिळण्यास मनुष्याच्या अंगीं स्वावलंबन हा एक गुण असला पाहिजे. स्वावलंबनानें जितकीं कामें होतात तितकीं संपत्तीनेंही होत नाहींत. मनुष्याजवळ पाहिजे तितकी संपत्ति असली तरी पुष्कळ गोष्टींत त्याला दुसऱ्यावर अवलंबून राहवें लागतें. पण ज्याचे अंगीं स्वावलंबन आहे तो दुसऱ्याच्या मदतीची वाट न पाहतां आपल्या बळाच्या जोरावर कोणतेंही कार्य करून टाकितो. जो स्वावलंबन करितो तो आपल्या श्रमानें आपली भाकर मिळवितो, आपल्या कष्टानें आपलें वस्त्रप्रावरण संपादितो व आपल्या मेहनतीनें आपल्या चीजवस्तूचें रक्षण करितो. स्वतःच्या हिंमतीवर, योग्यतेवर व दूरदर्शित्वावर जो अवलंबून असतो तोच खरा श्रीमान् ह्मणावयाचा.

२ स्वावलंबनासारखें सुख नाहीं व परावलंबनासारखें दुःख नाहीं. मनूनें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं;—

यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् ।
यद्यदात्मवशं तु स्यात् तत्तत्सेवेत यत्नतः ॥
सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखं ।

**भावार्थः**—कोणत्याही कामीं दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये. आपल्या हिंमतीच्या जोरावर नेहमीं कार्य करीत असावें. कारण परावलंबन हें दुःख व स्वावलंबन हें सुख असें ह्मटलें आहे.

३ कुबडी घेऊन चालणाऱ्या मनुष्याचे जसे सदोदित हाल

होतात तसे परावलंबन करणाऱ्या मनुष्याचेही हाल होतात. पण ज्याला स्वावलंबनाची संवय असते तो कशालाही डगमगत नाहीं व कसलेंही संकट येवो, त्याचें त्याला कांहींच वाटत नाहीं. स्वतःचा प्रयत्न हेंच अयुष्यांत सुख मिळविण्याचें मोठें साधन आहे. सद्धेतु, दृढनिश्चय व स्वावलंबन यांच्यायोगानें मनुष्य वाटेल तें काम तडीस नेतो व अशा रीतीनें तडीस नेलेल्या कामापासून मनुष्याला जो आनंद होतो तो त्याचा त्यालाच ठाऊक. इतरांना त्याची कल्पनासुद्धां करितां येणार नाहीं !

१ स्माइल्स[१] ह्मणतो " मनुष्याच्या अंगीं गुणांची वृद्धि होणें हें आत्मसाहायाचें मुख्य तत्व आहे ही गोष्ट कित्येक महात्म्यांच्या चरित्रांत दृष्टोत्पत्तीस येते. आत्मसाहायाच्यायोगानें उमेद व सामर्थ्य येतें. कोणतीही गोष्ट स्वतःच्या मदतीनें जितकी चांगली होते तितकी दुसऱ्याच्या मदतीनें होत नाहीं. कोणतेंही एखादें कृत्य दुसऱ्यानें केलें ह्मणजे आपणास तें करण्याची जरूर राहत नाहीं, त्यामुळें आंगीं आळस प्रवेश करितो. "

---

१ स्माइल्सः—या इंग्लंडांतील प्रख्यात ग्रंथकाराचा जन्म इ० स० १८१२ या वर्षी झाला. हा प्रथमतः शस्त्रवैद्य होता. पण पुढें तो धंदा सोडून देऊन यानें 'लीडस् टाइम्स' नांवाच्या वर्तमानपत्राचें चालकत्व पतकरिलें व त्यांत निरनिराळ्या विषयांवर सुरस व चटकदार लेख लिहिण्यास सुरवात केली. हा १८५२ पासून १८६६ पर्यंत साउथ ईस्टर्न रेल्वे कंपनीचा सेक्रेटरी होता. यानें अनेक ग्रंथ केले आहेत. त्यांत 'जॉर्ज स्टीफनसनचें चरित्र,' 'एंजिनिअर लोकांचीं चरित्रें,' 'उद्योगी पुरुषांचीं चरित्रें,' 'बोल्टन आणि वॅट' यांचीं चरित्रें,' 'सेल्फ् हेल्प,' थ्रिफ्ट्,' 'कॅरेक्टर,' 'ड्यूटी,' हे मुख्य होत. शेवटचे ४ ग्रंथ तर इतके लोकप्रिय झाले आहेत कीं, त्यांच्या पुष्कळ अवृत्त्या निघून त्यांचा सगळ्या जगभर खप होत आहे.

५ स्वावलंबन ही प्रवाशाची काठी आणि कारागिराचें हत्यार आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. अडचणीचा दरवाजा खुला करण्याची मुख्य किल्ली स्वावलंबन हीच होय. ‘स्वतःला तूं मदत कर ह्मणजे ईश्वर तुला मदत करील’ अशी एक इंग्रजी भाषेंत ह्मण आहे ती अक्षरशः खरी आहे. आळशी असून जो दुसऱ्याच्या मदतीची नेहमीं वाट पाहतो त्याची ईश्वराला मुळींच दया येत नाहीं. आणि तो त्याला साहाय्यही करीत नाहीं. पहिल्यापासून दुसऱ्याची मदत घेण्याची ज्याला संवय लागली असते त्याला अखेरपर्यंत दुःख भोगावें लागतें.

६ आपल्या मदतीनें आपणास शक्ति येते आणि दुसऱ्याच्या मदतीनें आपणास अशक्तता येते. ज्याप्रमाणें मोठीं आणि कणकर झाडें थंडगार ठिकाणीं किंवा सावली केलेल्या बागेंत न निपजतां खडकाळ व सोसाट्याचा वारा वडविणाऱ्या उंच डोंगरावर निपजतात त्याप्रमाणें बलवान् आणि धाडसी मनुष्यें दुसऱ्यांनीं वाढवून किंवा दुसऱ्यांनीं मदत करून न निपजतां स्वतःच्या उद्योगानें व स्वतःच्या मदतीनेंच निपजातात. बिंड्याच्या किंवा भोंपळ्याच्या मदतीनें मनुष्याला चांगलें पोहतां न येतां आपले हातपाय हालवूनच असें त्याला पोहता येतें तसें दुसऱ्याच्या मदतीनें मनुष्याच्या अंगीं धैर्यसाहसादि गुण न येतां ते स्वतःच्या प्रयत्नानें व स्वतःच्या मदतीनेंच येतात.

७ दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची संवय लागल्यानें मनुष्याचें आतोनात नुकसान होतें. जो मनुष्य परावलंबी आहे त्याचे स्वातंत्र्य, मानसिक उत्साह आणि विचारशक्ति हीं सर्व नष्ट होऊन तो दुसऱ्याचा अगदीं बंदा गुलाम बनतो. दुसऱ्याच्या मदतीकरितां सदोदित वाट पाहत राहणें हें नामर्दपणाचें लक्षण आहे. कोणतीही

गोष्ट स्वतः करीन अशी ज्याला धमक आहे त्याला कसलीही वाईट स्थिति प्राप्त झाली तरी तो डगमगत नाहीं. कांहीं होवो अडचणींशीं सपाटून टक्कर देईन असें ज्याला वाटतें त्याला हटकुन यश येतें. कारलाइल यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, 'जो विपत्तीशीं झुंजला आहे व ज्यानें स्वतः अतिशय श्रम केले आहेत तो मांडीवर मांडी टाकून स्वस्थ घरांत बसणाऱ्या मनुष्यापेक्षां अधिक बलवान्, अधिक धैर्यवान् आणि अधिक शाहाणा असतो यांत तिळमात्र संशय नाहीं.' खरें आहे. मनुष्याच्या अंगीं दुरदर्शित्व, व्यवहारज्ञान आणि सारासारविचारशक्ति हीं येण्यास खरोखर त्याला हाल, अपयश व निराशा हीं प्राप्त झालींच पाहिजेत.

८ दुःख भोगिल्यानें मनुष्यास सुख होतें हें म्हणणें सकृद्दर्शनीं अगदीं खोटें दिसतें पण थोडा विचार केला म्हणजे तें सर्वथैव खरें आहे असें म्हणावें लागतें. कारण आयुष्यांत सुख मिळण्यास मनुष्याच्या अंगीं पुष्कळ गुण आले पाहिजेत आणि अंगीं पुष्कळ गुण येण्यास मनुष्याचा स्वभाव कसला लागला पाहिजे. वारंवार मोहक वस्तूशीं गांठ पडावी तेव्हांच मनुष्याच्या आत्मसंयमनाची परीक्षा कळेल व वरचेवर हालअपेष्टा होतील तेव्हांच त्याच्या धैर्याची, साहासाची आणि उत्साहाची पारख होईल. जी मेंढी सकाळपासून संध्याकाळपर्यंत लांबलांबच्या डोंगरावरील कांटेरी झाडांत चरत असते व जिचे पाय उंच उंच कड्यांवरून एकसारख्या उड्या मारिल्यामुळें अगदीं रक्तबंबाळ झाले असतात ती सायंकाळीं आपल्या कोंडवाड्याकडे जाऊं लागली म्हणजे तिला जो आनंद

१ कारलाइलः—( पान ५ यांतील टीप पहा. )

होतो त्याच्या शतांशा इतकाही आनंद जी मेंढी दिवसभर कोंडवाड्याजवळील हिरव्यागार शेतांत चरत असते तिला होत नाहीं. याप्रमाणें अनिष्ट प्रसंग व दुःखदायक स्थिति यांशीं लढून ज्यानें जय मिळविला असतो त्याचा आनंद दोनवेळ चमचमीत जेवणाऱ्या व रात्रंदिवस मऊ बिछान्यावर लोळणाऱ्या मनुष्यापक्षां सहस्रपट अधिक आहे असें ह्मटल्यास अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं. बुद्धि प्रगल्भ होण्यास, स्वभाव शांत आणि गंभीर होण्यास, सदाचरणानें सुरेख वळण लागण्यास व स्वावलंबन पूर्णपणें अंगीं बिंबण्यास नेहमीं विपत्तीशीं गांठ पडून मनुष्याला एक अनुभवच आला पाहिजे. अंगीं धाडस असतें तोच मनुष्य अडचणीच्या शिखरावर चढतो व त्यालाच भोंवतालचा रम्य आणि मनोहर प्रदेश दिसतो. सुखाला पोंचण्याचा मार्ग नुसता उंच सखल आहे एवढेंच नाहीं तर तो खड्यांनीं व कांट्यांनीं अगदीं व्याप्त आहे आणि तो तसा असावा यांतच मनुष्याचें हित आहे. करितां मनुष्यावर कितीहीं संकटें ओढवलीं व त्याला कितीही आपजय आले तरी त्यांचा त्यानें विषाद न मानितां आपणास फिरून यत्न करण्यास तीं उत्तेजन देतात व स्वावलंबनाचा मोठा आणि उपयुक्त धडा शिकवितात असेंच समजलें पाहिजे.

९ स्वावलंबन शिकण्याची पहिली आणि मुख्य जागा ह्मटली ह्मणजे शाळा ही होय. पंतोजीनें विद्यार्थ्याला लहानपणापासून स्वतः धडे पाठ करण्याची, स्वतः कठिण अर्थ समजून घेण्याची व स्वतः विचार करण्याची संवय लावली पाहिजे. त्याचप्रमाणें परीक्षेंत नापास झाल्यास त्याचा खेद न मानितां पुन्हां प्रयत्न कसा करावा, स्वतः किती गोष्टी केल्या पाहिजेत, दुसऱ्या विद्यार्थ्यांची सदोदित

मदत घेतल्यानें आपलें किती नुकसान होतें हेंही पंतोजीनें त्यास शिकविलें पाहिजे. ह्मणजे पुढें व्यवहारांत त्याला कोणत्याही गोष्टींत अडचण उत्पन्न होऊन तो घोंटाळ्यांत पडत नाहीं. हें शिक्षण हल्लीं आमच्या शाळांतून मुलांना मुळींच मिळत नाहीं. हल्लीं ज्ञान-संपादन करण्याचे जे मार्ग झाले आहेत ते कित्येक विद्वानांस पसंत नसून अलीकडच्या शिक्षण पद्धतींत तो एक मोठा दोष आहे असें ते समजतात. पूर्वीं ज्ञानप्राप्तीसाठीं विद्यार्थ्यांना स्वतः फार विचार आणि फार परिश्रम करावे लागत. पण आतां त्यांच्याकरितां नवीन मार्ग शोधून काढिल्यामुळें ते इकडे तिकडे न पाहतां थेट त्या मार्गानें जातात. कठिण वाक्याच्या अर्थाचें पुस्तक, शब्दार्थाचें पुस्तक, अन्वय-अर्थाचें पुस्तक अशीं हजारों पुस्तकें झाल्यामुळें विद्यार्थ्यांना स्वतः विचार करण्याचा प्रसंगच येत नाहीं. रघु किंवा कुमारसंभवा सारखें एखादें काव्य विद्यार्थी वाचूं लागला कीं, अगोदर त्यावरील टीकेचें पुस्तक हुडकितो! त्याला वाटतें कीं, आयतें जर टीकेचें पुस्तक आहे तर उगीच डोकेंफोड कोणी करून घ्यावी! त्याचप्रमाणें एखादा विद्यार्थी ग्रीसच्या, रोमच्या अगर इंग्लंडच्या इतिहासाचें अध्ययन करूं लागला आणि त्याला एखादें भानगडीचें प्रकरण आढळलें कीं, त्याचा यत्किंचितही विचार न करितां टीकाकार काय ह्मणतात तें हुडकूं लागलाच! सारांश, अनेक पुस्तकांवर अनेक विद्वानांनीं टीका करून जर तीं आयतीच सुबोध करून ठविलीं आहेत तर टीका वाचावयाचें सोडून देऊन उगीच श्रम कां करावेत असें ज्या त्या विद्यार्थ्याला वाटत असतें. यावरून विद्यार्थ्यानें पुस्तकावरील टीका वाचूं नये असें आमचें ह्मणणें नाहीं. वाचावी. पण त्यानें प्रथमतः थोडे तरी श्रम करावेत आणि ती वाचावी. पुस्तकावर टीका आहे असें ह्मणून कांहीं एक न

करितां केवळ टीकेवर त्यानें अवलंबून राहूं नये. तसा जो राहील त्याची विचारशक्ति जितकी कसाला लागावी तितकी लागत नाहीं व त्याचें स्वतःचें मत अगदीं नाहींसें होऊन तो दुसऱ्याच्याच मताचा अनुयायी होतो. हल्लीं अतिशय बुद्धिवान्, विद्वान् आणि हुषार विद्यार्थी फार निपजत नाहींत याचें कारण तरी हेंच आहे.

१० शाळेंतील विद्याभ्यास संपून आपण एखादा कायमचा धंदा करूं लागलों व मधून मधून ज्ञानामृताच्या इच्छेनें निरनिराळ्या विषयावरील पुस्तकें वाचूं लागलों तरीसुद्धां आपल्या विचारशक्तीला जेवढी मेहनत मिळावी तेवढी मिळत नाहीं. रासायनिक द्रव्यें, यंत्रें, चित्रें, प्रयोग इत्यादि सर्व उपकरणांची आयतीच माहिती पुस्तकांत दिल्यामुळें विषयाबद्दल आपणास फारसा विचार करावा लागत नाहीं. ह्मणजे मानसिक श्रम जसे व्हावेत तसे होत नाहींत. अर्थात् थोडेसे श्रम झाले कीं, ते आपल्या शक्तीच्या बाहेर आहेत असें वाटूं लागतें व पुस्तक कितीही सुलभ असलें तरी ते आणखी सुलभ असावें असें वाटतें. परावलंबनासंबंधीं एका अनुभविक इंग्लिश ग्रंथकारानें एके ठिकाणीं जें लिहिलें आहे तें प्रत्येकानें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तो ह्मणतो—" ज्याप्रमाणें पृथ्वीवरील कित्येक भागांतील लोक प्रवाशांना डोंगरावर न्यावयाचें झालें ह्मणजे आपल्या पाठीवर बसवून नेतात त्याप्रमाणें कित्येक शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना आपल्या पाठीवर बसवून ज्ञानपर्वताच्या अत्युच्च शिखरावर पोंचवितात. ज्याप्रमाणें आगबोटीची किंवा आगगाडीची शीट उतारूकरितां ओरडते आणि त्याला सुचविते कीं, अमुक स्टेशन आलें तर या ठिकाणीं तूं उतर, त्याप्रमाणें जें पुस्तक आह्मी वाचतों त्या पुस्तकानेंच आह्मांस एकंदर शास्त्ररूपी व कलारूपी राजधानीस पोंचवावें असें आह्मांस वाटतें. रसायन, ज्योतिष,

पदार्थविज्ञान इ० शास्त्रांचें रहस्य कळण्याकरितां नगारा केल्याशिवाय आपण एखाद्या सार्वजनिक व्याख्यानास जातो, धर्मज्ञानाकरितां एखाद्या शास्त्र्याचें किंवा पुराणिकाचें झोंपेंतच पुराण श्रवण करितों व राज्यकारस्थानाकरितां एखाद्या वर्तमानपत्राकडे धांव मारितों. आणि जव्हां कां एखादा उत्तम तत्ववेत्ता पुढें सरसावतो आणि निभिडपणें स्पष्ट सांगतो कीं, बापहो, श्रम, उद्योग, निश्चय व स्वावलंबन हींच एकंदर ज्ञानाचीं रहस्यें आहेत व सुख मिळालें तर यांपासूनच मिळेल, तव्हां आह्मांला असें वाटूं लागतें कीं, होय, हा सांगतो तें खरें आहे. दुसऱ्यावर आपण किती वेळ अवलंबून राहावें ? परावलंबनानें आह्मांस शास्त्ररहस्य कसें समजेल व ज्ञानामृत कसें प्यावयास मिळेल ? परावलंबनामुळें आमचा वेळ उपयुक्त कामांत कसा जाईल व आह्मांस कसें सुख होईल ? करितां आळस टाकला पाहिजे आणि उद्योगास लागलें पाहिजे तरच आपणांस सुख मिळेल एरव्हीं तें कधींही मिळणार नाहीं. "

११ स्वावलंबनानें मनुष्य किती योग्यतेला चढतो हें इंग्लंडांतील प्रसिद्ध पुरुष जो बेंजामिन डिसराईली याच्या उदाहरणाव

१ बेंजामिन डिसराइली:—हा इंग्लंडांत एक प्रख्यात मुत्सद्दी होऊन गेला. याचा जन्म इ० स० १८०५ या वर्षी झाला. यानें वकीलीचा धंदा करावा ह्मणून याच्या बापानें प्रथमतः याला एका अटर्नीच्या हाताखालीं ठेविलें होतें. पण तें काम सोडून तो इ० स० १८२६ या वर्षी 'रिप्रिझेंटेटिव्ह' नांवाच्या वर्तमानपत्रांत लेख लिहूं लागला. या पत्राचा अवतार सगळा ५ महिन्यांतच आटपला. तथापि, तेवढ्या अवधींत बऱ्याच राजकीय विषयांचा त्यानें अभ्यास केला. यानें पुष्कळ दिवस प्रयत्न केल्यावर इ० स० १८३७ या वर्षी याची पार्लमेंटामध्यें प्रथमतः निवड झाली. पुढें बांकिंगह्याम व श्रूजबरी या परगण्यांच्या तर्फे याची दोन वेळ पुन्हां निवड झाली. इ० स० १८६८ या वर्षी हा इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला. यानें कांहीं कादंबऱ्या लिहिल्या आहेत व कांहीं कविताही केल्या आहेत.

रून चांगलें कळून येतें. डिसराइली हा प्रथमतः एका अटर्नीचा कारकून होता. पण पुढें तो इतक्या योग्यतेस चढला कीं, इंग्लंडची मुख्य प्रधानगिरी त्याला मिळाली. त्याच्या अंगीं इतकी योग्यता येण्यास त्याचा सरळ स्वभाव, त्याचा अचाट उद्योग व त्याचें विलक्षण धैर्य हींच कारणीभूत होतीं असें कित्येक लोक ह्मणतात आणि तें सर्वांशीं खरेंही आहे. पण त्या सर्वांबरोबर त्याचे अंगीं जर स्वावलंबन नसतें तर त्याचें घोडें अगदीं लंगडें पडून त्याला जसा जय आला तसा आला नसता.

१२ अमेरिकेंत कॅलहोअन[१] ह्मणून एक प्रख्यात वक्ता आणि मुत्सद्दी होऊन गेला. तोही डिसराइली सारखाच स्वावलंबन करणारा होता. स्वावलंबनाविषयीं त्याची एक मजेदार गोष्ट आहे. ती अशीः—तो येल येथील विद्यालयांत विद्याभ्यास करित असतां त्याचें रात्रंदिवस अभ्यासावरील लक्ष्य पाहून तेथील दुसऱ्या एका विद्यार्थ्यास त्याच्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला. तेव्हां उपहास करण्याच्या हेतूनें तो विद्यार्थी त्यास ह्मणाला 'कॅलहोअन, जेव्हां पहावें तेव्हां तूं अभ्यास करीत असतोस. इतका अभ्यास करून तूं काय दिवा लावणार तें मला माहित आहे.' कॅलहोअनाला या भाषणाचा मुळींच विषाद वाटला नाहीं. उलट त्यानें मोठ्या उत्सुकतेनें आपल्या विद्यालयबंधूस असें उत्तर दिलें कीं, "अरे, दिवा लावतो कीं नाहीं तें पहा. मला इतका अभ्यास केलाच पाहिजे.

१ कॅलहोअनः—जन्म इ० स० १७८२ मृत्यु इ० स० १८५०. यानें ४० वर्षे पर्यंत संस्थानचीं अनेक महत्वाचीं कामें केलीं. हा कांहीं दिवस लढाईचें सेक्रेटरी होता. कांहीं दिवस व्हाइस प्रेसिडेंट होता व कांहीं दिवस सेनेटर होता. यानें केलेले ग्रंथ याच्या मरणानंतर प्रसिद्ध झाले.

कारण, पुढें कायदेकौंसिलमध्यें मी सभासद होऊन गेलों ह्मणजे मला माझें कर्तव्य योग्य प्रकारें बजावतां आलें पाहिजे.' हें ऐकून तर त्या विद्यार्थ्यानें त्याची फारच फजिती उडविली. पण ती पाहून कॅलहोअनला अधिकच उत्साह आला आणि तो त्यास ह्मणाला 'तुला शंका वाटते होय ? मी खात्रीपूर्वक सांगतों कीं, आजपासून तीन वर्षांच्या आंत जर सभासद या नात्यानें मी त्या सभेंत जाऊन बसणार नाहीं तर माझें नांव परतून ठेव.' पुढें खरोखरच कॅलहोअनानें आपलें वचन पूर्ण केलें व कायदेकौंसिलमध्यें आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजाविलें.

१२ गोएथे[1] लोकांना असा उपदेश करितो कीं, 'तुम्ही ज्या जागेवर राहतां ती जागा डळमळीत न ठेवितां भरभक्कम आणि बळकट ठेवा ह्मणजे तुह्मांला जगसुद्धां हालवितां येईल; या उपदेशाचा तात्पर्यार्थ इतकाच कीं, मनुष्य जी गोष्ट साध्य व्हावी ह्मणून इच्छा करितो व जीबद्दल तो अहोरात्र परिश्रम करितो तिचा पायाच त्यानें खंबीर व मजबूत घातला पाहिजे. ह्मणजे त्यावर त्याला केवढीही टोलेजंग इमारत उठवितां येईल.' तुमच्या स्वतःची

१ गोएथः—( Goethe )-जर्मनींतील प्रख्यात कवि व ग्रंथकार. जन्म १७४९. मृत्यु १८३२. हा १५ वर्षांचा असतांना लिपझक येथील युनिव्हार्सिटीमध्यें विद्याभ्यासाकरितां गेला होता. पण पुढें १७६८ या वर्षी कायद्याचा अभ्यास करण्याच्या उद्देशानें तो तेथून स्ट्रॅसबर्ग येथील युनिव्हार्सिटींत गेला. तेथें कायद्याच्या अभ्यासापेक्षां रसायन, शारीर इ० शास्त्रांच्या अभ्यासाकडे त्याचें अधिक लक्ष्य लागलें. १७७९ या वर्षी यानें वेमरच्या ड्यूकची नोकरी पतकरिली. पुढें कांहीं दिवस हा इटालींत गेला होता. यानें कांहीं काव्यें व कांहीं ग्रंथ केले आहेत. त्यांत 'फस्ट' नांवाचें काव्य उत्तम साधलें असून तें तत्त्वज्ञानानें भरलें आहे.

तुह्मी खात्री बाळगा ह्मणजे तुह्मी इकडची दृष्टि तिकडे कराल ' असें जें एका थोर गृहस्थाचें वचन आहे तेंही वाचकानीं नेहमीं ध्यानांत ठेवावें.

१४ स्वावलंबनासंबंधानें जार्ज हेनरी ल्युई[१] यांचें असें ह्मणणें आहे कीं, " मनुष्याला आपल्या कर्तबगारीवरून आपल्या अंगीं किती शक्ति आहे हें सहजीं कळून येतें. विटा, वांसे, धोंडे, माती, कौलें हीं एकच असतात. पण एक त्याचें खोपट तयार करितो, दुसरा त्यांचा बंगला बनवितो. याप्रमाणें एकाच कुटुंबांत व एकाच स्थितींत असणाऱ्या मनुष्यांपैकीं एक आळशी असतो, दुसरा उद्योगी असतो. एकास खाण्यापिण्यास कधीं कमतरता नसते, दुसऱ्याची सदा उपास-मर चालली असते. सारांश, एकास सदा सुखोपभोग मिळतो व दुसऱ्याच्या वाऱ्यास सदा हालअपेष्टा हीं आलीं असतात. असा फरक राहण्याचें कारण काय ? कारण हेंच कीं, एकाच्या अंगीं कर्तबगारी, उत्साह व स्वावलंबन हीं असतात. व दुसऱ्याच्याठायीं तीं मुळींच नसतात. जो ह्मणून धाडसी, निश्चयी व स्वतःचा प्रयत्न करणारा असतो तो वाटेंतील अडचणींच्याच पायरीवरून सुखाच्या घरात प्रवेश करितो व ज्याच्या अंगीं हिंमत, उद्योग व दृढनिश्चय हीं नसतात तो त्याच पायरीला ठेंचळून खालीं पडतो.

१५ या जगांत जन्मल्यापासून आपल्यावर एक मोठी जबा-

---

१ जॉर्ज हेनरी लुई:—इंग्लंडांतील प्रख्यात ग्रंथकार. जन्म १८१७. मृत्यु १८७८. हा कांहीं दिवस इंग्लंडांतील प्रख्यात वर्तमानपत्रांतून व मासिक पुस्तकांतून लेख लिहीत होता. पुढें यानें स्वतंत्रपणें ग्रंथ लिहिण्यास सुरवात केली. याच्या ग्रंथांत ' गोएथचें ग्रंथ व चरित्र ' व ' माक्झिमिलन रोबिसपियराचें चरित्र ' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यानें सुरस अशीं कांहीं नाटकेंही लिहिलीं आहेत.

बदारी पडली आहे व आपलें व आपल्या ज्ञातिबांधवांचें एक मोठें काम करावयाचें आहे असें रात्रंदिवस मनांत बाळगून प्रत्येकानें स्वतंत्र विचार व स्वतंत्र कृति यांचें अवलंबन केलें पाहिजे. प्रत्येक मनुष्याचा आपल्या भोंवतालच्या थोड्या किंवा अधिक मनुष्यांशीं संबंध असतोच असतो. आणि त्या थोड्या किंवा अधिक मनुष्यांचा आणखी आपल्या भोंवतालच्या थोड्या किंवा अधिक मनुष्यांशीं संबंध असतो. ह्मणजे प्रत्येक मनुष्य नुसत्या एका लहान अथवा मोठ्या वर्तुळाचा मध्यबिंदु असतो एवढेंच नाहीं तर त्याच्या भोंवतीं हजारों लहान मोठीं वर्तुळें असतात. ह्मणून आपण जो विचार अथवा जी कृति करितों तिचा परिणाम एका दोघांवरच न होतां असंख्य लोकांवर होतो असें पक्कें लक्ष्यांत ठेवूनच कोणत्याही मनुष्यानें कोणता एखादा विचार अथवा कोणती एखादी कृति करावी. त्याचप्रमाणें आपल्या विचाराचा व आपल्या कृतीचा आजच तेवढा परिणाम होईल, पुढें कधीं होणार नाहीं असेंही त्यानें समजतां कामा नये. आपले शब्द, आपलें संभाषण, आपले विचार, आपली कृति आपलें आचरण यांचा परिणाम इतक्या कांहीं जीवांवर व इतका कांहीं वेळ होत असतो कीं, त्याची कल्पनासुद्धां करतां येत नाहीं!

१६ आपण अशा तऱ्हेचा विचार करावा कीं, त्यापासून आपल्या अंगीं काम करण्याचें बळ यावें व आपल्या मानसिक शक्तींचा विकास व्हावा. त्याचप्रमाणें आपण अशा तऱ्हेचें आचरण ठेवावें कीं, ज्याच्यायोगानें आपल्या ज्ञातिबांधवांविषयीं आपलीं जीं कर्तव्यकर्मे आहेत तीं सहज बजावितां यावीत. आतां स्वतंत्र विचार व स्वतंत्र कृति यांचें अवलंबन करून आपणा सर्वांस कांहीं शिवाजी[१]

१ शिवाजी:—( पृष्ट १२ यांतील टीप पहा. )

सारखा पराक्रम गाजवून अक्षय्य कीर्ति मिळवितां येणार नाहीं; शेक्सपीअरें, मिल्टनें, वर्डस्वर्थें, कालिदासें,

---

१ शेक्सपीअरः—हा इंग्लंडांतील अति विख्यात कवींपैकीं एक कवि होऊन गेला. जन्म इ० स० १५६४. मृत्यु इ० स० १६१६ यानें लहानपणीं स्ट्रॅफर्ड येथील शाळेंत विद्याभ्यास केला. पुढें नाटककंपन्यांतून कांहीं दिवस यानें नटाचें काम केलें. यानें एकंदर ३०।३५ नाटकें लिहिलीं आहेत. त्यांत 'हॅम्लेट,' 'किंगलिअर,' 'ज्यूलिअस सीझर,' 'मॅकबेथ,' 'कॉमेडी ऑफ् एरर्स,' हीं मुख्य आहेत. यांतही पहिलीं दोन इतकीं उत्कृष्ट साधलीं आहेत कीं, त्यांच्या तोडीचीं नाटकें अवघ्या भूमंडळावर क्वचितच सांपडतील! याची कल्पनाशक्ति विशाल असून याला मनुष्यस्वभावाचें चांगलें ज्ञान होतें. या ज्ञानाचें हुबेहुब प्रतिबिंब त्यानें आपल्या नाटकांत वठविलें आहे. राणी इलिझाबेथ इची त्याजवर पूर्ण मर्जी होती. तिनें त्याच्या कित्येक नाटकांचे प्रयोग आपल्या समोर करवून त्याला पुष्कळ इनाम दिलें आहे.

२ मिल्टनः--हाही इंग्लंडांतील अतिविख्यात कवींपैकीं एक कवि होऊन गेला. जन्म १६०८. मृत्यु १६७४. यानें शिक्षण केंब्रिज येथील ख्रायेस्ट्स कॉलेजांत झालें. याच्या बापाच्या मनांत यानें वकिलीचा किंवा धर्मोपदेशकाचा धंदा करावा असें होतें. पण मिल्टनाला तें न आवडून तो होर्टन (बाकिंगहॅमशायर) येथें आपल्या बापाजवळ येऊन राहिला. तेथें यानें कविता लिहिण्यास आरंभ केला. यानें जीं काव्यें केलीं आहेत त्यांत 'पॅरेडाइज लॉस्ट' आणि 'पॅरेडाइज रीगेन्ड' हीं मुख्य आहेत. यानें कांहीं नाटकेंही लिहिलीं आहेत. त्यांत 'सॅमसन ॲगोनिस्ट' हें नाटक सुरस वठलें आहे. जेव्हां पहिला चार्लस राजा व पार्लमेंट यांच्यामध्यें भांडण सुरू झालें तेव्हां राजपक्षाविरुद्ध यानें बरीच खरमरीत टीका केली. इ० स० १६४९ या वर्षी कॉमनवेल्थनें याला फॉरिन सेक्रेटरी नेमिलें होतें. मरणापूर्वी याची दृष्टि गेली होती.

३ वर्डस्वर्थः---इंग्लंडांतील प्रख्यात कवींपैकीं एक कवि होऊन गेला. जन्म १७७०. मृत्यु १८५०. हा एका ॲटर्नीचा मुलगा होता. याचें शिक्षण सेंट जॉन्स कॉलेज (केंब्रीज) येथें झालें. यानें कांहीं दिवस फ्रान्स व जर्मनी या देशांतून प्रवास केला. याच्या कवितेचीं निरनिराळीं ॰ पुस्तकें आहेत. साउदेच्या पाठीमागून इ० स० १८४३ या वर्षी याची राजकवीच्या जागीं नेमणूक झाली.

४ कालिदासः---( पान १७ यांतील टीप पहा )

भवभूति यांच्यासारखीं काव्यें लिहून लोकांचीं मनें आपल्या ताब्यांत ठेवितां येणार नाहींत; नानाफडणवीसे, विल्यम पिट्ट, ग्लॅडस्टन यांच्यासारखी बिकट राज्यकारस्थानें करून देशाचे देश

---

१ भवभूतिः—कालिदासाप्रमाणेंच हा कविही कोणत्या वेळीं होऊन गेला हें नक्की सांगतां येत नाहीं. तथापि, पंडितांच्या मतें हा ७ व्या शतकांत होऊन गेला असें आहे. हा जातीचा ब्राह्मण. याच्या बापाचें नांव गोपाळभट्ट व आईचें नांव जातुकर्णी. याचीं तीन नाटकें प्रसिद्ध आहेत. तीं 'मालतीमाधव,' 'महा वीरचरित' व 'उत्तर रामचरित' हीं होत. याच्या नाटकांत मुख्य रस करुण असून याला सृष्टिवैभव व लोकस्वभाव यांचें वर्णन करण्याची शैली अप्रतिम साधली होती. याच्या नाटकावरून याच्या हयातींत याची कीर्ति झाली नाहीं असें दिसून येतें.

२ नानाफडणवीस—(पान १८ यांतील टीप पहा)

३ विल्यम पिट्ट—(अर्ल ऑफ् चॅथॅम)—इंग्लंडांतील प्रख्यात वक्ता व मुत्सद्दी. जन्म इ० स० १७०८. मृत्यु १७७८. याचें शिक्षण ऑक्सफर्ड येथील ट्रिनिटी कॉलेजांत झालें. यानें प्रथमतः कांहीं दिवस सैन्यांत नोकरी धरली होती. १७५५ या वर्षी याची पहिल्यानें पार्लमेंटांत निवड झाली. १७५७ या वर्षी हा न्यूकॅसल याच्या मदतीनें प्रधानगिरीचा कारभार पाहूं लागला. याच्या कारकीर्दीत कानडा देश इंग्रजांस मिळाला. अमेरिकेंतील लोकांनीं स्वातंत्र्य मिळविण्याबद्दल इंग्रजांबरोबर जी लढाई चालविली होती त्यासंबंधानें पार्लमेंटांत कडाक्याचा वादविवाद करीत असतां याची प्रकृति बिघडून हा मरण पावला.

४ ग्लॅडस्टन—इंग्लंडांतील अति विख्यात मुत्सद्दी. जन्म इ० स० १८०९. मृत्यु इ० स० १८९८ यांचा ईटन व ऑक्सफर्ड येथील पाठशाळेंत विद्याभ्यास झाला. १८३२ या वर्षी यांची पार्लमेंटमध्ये पहिल्यानें निवड झाली. तेथून ६६ वर्षे हे सारखे पार्लमेंटचे सभासद होते. हे ४ वेळ इंग्लंडचे मुख्य प्रधान होते. हे नियमित असून विद्येचा व्यासंग फार करीत. हे मोठे ग्रंथकारही होते. यांनीं लहान मोठे सरासरी ३०० वर ग्रंथ लिहिले आहेत. हे धार्मिक असून सर्व युरोपखंडांत यांचे मोठें वजन होतें.



नानाफडणविस.

जन्म. इ. स. १७४१. मृत्यु. इ. स. १८००

शोधांस भर टाकतां येणार नाहीं. तथापि इतकें खरें आहे कीं, आपणा सर्वांस कोणत्या नाहीं कोणत्या तरी रीतीनें मानवी हित वाढवितां येईल व एकंदर जगाच्या सुखास भर टाकतां येईल. आमच्या गृहकृत्यांत आह्मांस नियमितपणें वागतां येईल, आमच्या व्यापारांत आह्मांस प्रामाणिकपणा ठेवितां येईल व आमच्या अनेक धंद्यांत सरळ मार्ग, सत्यवचन व सदुद्योग यांचें अवलंबन करून लोकांना सदाचरणाचा कित्ता घालून देतां येईल. **सर थॉमस फॉवेल बक्स्टनें**[१] यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, " उद्योग किंवा श्रम न करितां अमक्या एका कामांत अपयश आलें त्या अर्थीं ईश्वराच्याच मनांत आमचें वाईट करावयाचें होतें असें जर कोणी ह्मणेल तर तो मूर्ख समजावा. कारण जोंपर्यंत आपली खात्री आपणास नाहीं व जोंपर्यंत आपल्या कर्तव्याकडे आपण लक्ष्य देत नाहीं तोंपर्यंत अपयश हें येणारच. "

---

१ सर थॉमस फॉवेल बक्स्टन:--इंग्लंडांतील एक प्रख्यात गृहस्थ. जन्म इ० स० १७८६. मृत्यु १८४५. इ० स० १८१८ या वर्षीं याची पार्लमेंटामध्यें निवड झाली. यानें गुलामाचा व्यापार बंद करण्याविषयीं पुष्कळ चळवळ केली.

# खुबी.

१ आयुष्य सुखानें जाण्यास मनुष्याच्या अंगीं काम करण्याची खुबी असली पाहिजे. खुबी शिवाय स्वावलंबन, आत्मसंयमन इत्यादि गुणांना विशेष तेजी येत नाहीं. अंगीं मोठी विद्वत्ता व शहाणपण असून केवळ खुबी नसल्यामुळें जय मिळविण्याच्या आलेल्या अनेक उत्तम संधी फुकट घालविणारीं पुष्कळ माणसें आमच्या पहाण्यांत आहेत. खुबी ठाऊक नसल्यामुळें मित्रांचा रोष झालेलीं व आश्रयदात्यांच्या आश्रयास मुकलेलीं पुष्कळ मनुष्यें आह्मी पाहिलीं आहेत. व खुबी नसल्यामुळेंच मोठ्या दमाच्या, दृढनिश्चयी व दीर्घोद्योगी लोकांचें पुष्कळ आयुष्य व्यर्थ गेलेलें आह्मांस ठाऊक आहे. खुबी ही बुद्धीला देखील मागें सारिते. एका बड्या निबंधकारानें बुद्धि व खुबी यांची एके ठिकाणीं अशी तुलना केली आहे:—“ बुद्धि ही शक्ति आहे; खुबी हें कसब आहे. बुद्धि हें वजन आहे; खुबी हा टेंकू आहे. बुद्धीला काय करावें हें समजतें; खुबीला तें कसें करावें हें समजतें. बुद्धीच्या योगानें मनुष्य मानार्ह होतो; खुबीच्यायोगानें त्याला प्रत्यक्ष मान मिळतो. बुद्धि ही संपत्ति आहे; खुबी हा पैका आहे. बुद्धीला शत्रु उत्पन्न होतात; खुबीला मित्र येऊन मिळतात. बुद्धीला संधीचा उपयोग करितां येत नाहीं; खुबीला तो करितां येतो. ”

२ खुबी याची बरोबर व्याख्या आह्मांस देतां येत नाहीं. तथापि, खुबी कसली असते याचें बरोबर वर्णन आह्मी थोडक्यांत देऊं. खुबींत चालरीतीपेक्षां अधिक गोष्टींचा समावेश होतो. तथापि, चालरीतींचाच त्यांत विशेष संबंध असतो. खुबी हें तत्परता, दक्षता सराव व सुस्वभाव यांचें मिश्रण आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

शोधांस भर टाकतां येणार नाहीं. तथापि इतकें खरें आहे कीं, आपणा सर्वांस कोणत्या नाहीं कोणत्या तरी रीतीनें मानवी हित वाढवितां येईल व एकंदर जगाच्या सुखास भर टाकतां येईल. आमच्या गृहकृत्यांत आह्मांस नियमितपणें वागतां येईल, आमच्या व्यापारांत आह्मांस प्रामाणिकपणा ठेवितां येईल व आमच्या अनेक धंद्यांत सरळ मार्ग, सत्यवचन व सद्उद्योग यांचें अवलंबन करून लोकांना सदाचरणाचा कित्ता घालून देतां येईल. **सर थॉमस फॉवेल बक्स्टनें**[१] यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "उद्योग किंवा श्रम न करितां अमक्या एका कामांत अपयश आलें त्या अर्थी ईश्वराच्याच मनांत आमचें वाईट करावयाचें होतें असें जर कोणी ह्मणेल तर तो मूर्ख समजावा. कारण जोंपर्यंत आपली खात्री आपणास नाहीं व जोंपर्यंत आपल्या कर्तव्याकडे आपण लक्ष्य देत नाहीं तोंपर्यंत अपयश हें येणारच."

---

१ सर थॉमस फॉवेल बक्स्टनः--इंग्लंडांतील एक प्रख्यात गृहस्थ. जन्म इ० स० १७८६. मृत्यु १८४५. इ० स० १८१८ या वर्षीं याची पार्लमेंटामध्यें निवड झाली. यानें गुलामाचा व्यापार बंद करण्याविषयीं पुष्कळ चळवळ केली.

# खुबी.

१ आयुष्य सुखानें जाण्यास मनुष्याच्या अंगीं काम करण्याची खुबी असली पाहिजे. खुबी शिवाय स्वावलंबन, आत्मसंयमन इत्यादि गुणांना विशेष तेजी येत नाहीं. अंगीं मोठी विद्वत्ता व शहाणपण असून केवळ खुबी नसल्यामुळें जय मिळविण्याच्या आलेल्या अनेक उत्तम संधी फुकट घालविणारीं पुष्कळ माणसें आमच्या पहाण्यांत आहेत. खुबी ठाऊक नसल्यामुळें मित्रांचा रोष झालेलीं व आश्रयदात्यांच्या आश्रयास मुकलेलीं पुष्कळ मनुष्यें आह्मी पाहिलीं आहेत. व खुबी नसल्यामुळेंच मोठ्या दमाच्या, दृढनिश्चयी व दीर्घोद्योगी लोकांचें पुष्कळ आयुष्य व्यर्थ गेलेलें आह्मांस ठाऊक आहे. खुबी ही बुद्धीला देखील मार्गे सारिते. एका बड्या निबंधकारानें बुद्धि व खुबी यांची एके ठिकाणीं अशी तुलना केली आहे:—" बुद्धि ही शक्ति आहे; खुबी हें कसब आहे. बुद्धि हें वजन आहें; खुबी हा टेंकू आहे. बुद्धीला काय करावें हें समजतें; खुबीला तें कसें करावें हें समजतें. बुद्धीच्या योगानें मनुष्य मानार्ह होतो; खुबीच्यायोगानें त्याला प्रत्यक्ष मान मिळतो. बुद्धि ही संपत्ति आहे; खुबी हा पैका आहे. बुद्धीला शत्रु उत्पन्न होतात; खुबीला मित्र येऊन मिळतात. बुद्धीला संधीचा उपयोग करितां येत नाहीं; खुबीला तो करितां येतो. "

२ खुबी याची बरोबर व्याख्या आह्मांस देतां येत नाहीं. तथापि, खुबी कसली असते याचें बरोबर वर्णन आह्मी थोडक्यांत देऊं. खुबींत चालरीतीपेक्षां अधिक गोष्टींचा समावेश होतो. तथापि, चालरीतींचाच त्यांत विशेष संबंध असतो. खुबी हें तत्परता, दक्षता सराव व सुस्वभाव यांचें मिश्रण आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

खुबीला कोणी व्यवहारांत उपयोगी पडणारी बुद्धि असें ह्मणतात. आणि तें खरेंही आहे. तिचे घटकावयव ह्मटले ह्मणजे सद्वर्तनाचा जोर व काम करण्याची शैली हेच होत. कोणतीही नड तिला चटकन् दिसते व ती तिला भागवितां येते. व्यवहारांत बुद्धीच्या दसपट खुबीचा उपयोग होतो. बुद्धिमान् मनुष्य नुसते तर्क आणि वाक्पांडित्य चालवील पण खुबीदार मनुष्य कांहीं तरी ह्मणण्यासारखी कृति करील. बुद्धिवान् मनुष्याला पाहून लोकांना आश्चर्य वाटेल पण खुबीदार मनुष्याला पाहून ते थक्क होतील. बुद्धिवान् मनुष्यापेक्षां खुबीदार मनुष्यांत इतकें अधिक असतें कीं, वेळ न दवडतां, संधि फुकट न घालवितां, इकडे तिकडे न गमतां व आडमार्गानें न जातां तो कोणत्याही कामास हात घालतो. अर्थात् जय, समाधान व सुख हीं हटकून त्यास मिळतात.

३ कित्येक लोक असें ह्मणतात कीं, खुबीपेक्षांही बुद्धीचा प्रभाव मोठा असतो. पण हें ह्मणणें चुकीचें आहे. उलट आम्ही असें ह्मणतों कीं, प्रसंगविशेषीं खुबी ही बुद्धीला देखील मागें सारिते. एवढेंच नव्हे, तर बुद्धीचा उपयोग खुबीनेंच होतो. खुबी नाहीं तर बुद्धीचें कांहीं चालणार नाहीं. शिवाय खुबी प्रयत्नाधीन असल्यामुळें सर्वांना ती आपल्या अंगीं आणितां येते. बुद्धीचें तसें नाहीं. त्यामुळें ती कोठें कोठेंच दृष्टीस पडते. अवलोकन, मनन व मनोनिग्रह यांच्यापासूनच खुबीची उत्पत्ति असल्यामुळें व्यवहारांत बुद्धीपेक्षां खुबीचाच अधिक उपयोग होतो. अंगीं विद्वत्ता असून मनुष्य खूप बुद्धिवान् आहे पण त्याला खुबी कसली ती माहित नसेल तर त्याचें व्यवहारांत कांहीं एक चालणार नाहीं. एखाद्याला सोन्याचे गुणधर्म व त्याचीं मूळतत्वें याची चांगली माहिती आहे. पण बाजारांत गेल्यावर त्यानें सोनें ह्मणून पितळ खरेदी केलें तर त्याला कोण

हांमणार नाहीं ? त्याचप्रमाणें एखाद्याचा कापूस असा तयार होतो, सूत अमक्या यंत्रानें काढतात, वस्त्र अमक्या गिरणींत विणतात इ० गोष्टींची रेलचेल माहिती असून त्यानें रामनारायण मारवाड्याच्या दुकानांतून चांगलें ह्मणून जर कुजकें कापड आणिलें तर त्याची फजिती झाल्याशिवाय राहील काय ? सारांश, व्यवहार जाणण्यास खुबी लागते. तेथें बुद्धि आणि विद्वत्ता यांना स्वस्थच बसावें लागतें.

४ एका विद्वान् ग्रंथकाराचें असें ह्मणणें आहे कीं, ' एकंदर ज्ञानांत व्यवहारज्ञान हें श्रेष्ठ होय. आणि व्यवहारज्ञानांतच खुबीचा समावेश होतो. करितां खुबीला जितकें महत्व आहे तितकें दुसऱ्या कशालाही नाहीं. ज्याच्या अंगीं खुबी आहे तो कांहीं तरी कर्तबगारी करितो व इच्छित वस्तु प्राप्त करून घेतो. पण खुबी नसणाऱ्या मनुष्याला काय करावें हें समजत नसल्यामुळें त्याला ती मिळत नाहीं. आपल्या सभोंवतीं काय चाललें आहे, स्वतःची स्थिति कशी आहे, दुसऱ्याच्या गरजा काय आहेत इ० गोष्टी चांगल्या समजून घेऊन त्याप्रमाणें जो आचरण ठेविता त्यालाच आयुष्यांत सुख मिळविण्याची किल्ली सांपडली असें समजावें.

५ कित्येक लोक कांहीं चांगल्या गोष्टी करतात. पण तेवढ्यानेंच त्यांना जय येतो असें नाहीं. तर त्या योग्य वेळीं व योग्य स्थळीं केल्या पाहिजेत म्हणजे जयाची खात्री असते. फ्रेडरिक धि ग्रेट[1]

१ फ्रेडरिक धि ग्रेटः—हा प्रुशियाचा राजा. जन्म इ० स० १७१२. मृत्यु १७८६. हा उपजत मोठा तेजस्वी होता. याला काव्य, गान वगैरे कलांची मोठी अभिरुचि होती. ही अभिरुचि त्याच्या बापास नसल्यामुळें तो बापाला रानटी, अडाणी अशीं विशेषणें देई. हें बापास न खपून त्याचें व याचें

( पुढील पृष्ठ पहा. )

यानें जर्मनीचा बादशहा जो दुसरा जोसेफ¹ याजविषयीं एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, 'त्याला पहिलें पाऊल टाकण्यापूर्वींच दुसरें टाकावें असें वाटे.' ह्मणजे मधली जागा न ओलांडतां एकदम इच्छित स्थळीं पोंचावें असें त्याला वाटे. अशा प्रकारचें व्यवहारज्ञान न समजणारे पुष्कळ लोक या जगांत असतात व ते वरील बादशहा प्रमाणें अगदीं उतावीळ असल्यामुळें नेहमीं फसतात. परिस्थिति, काळ, वेळ, प्रसंग, इत्यादिकांच्या अनुरोधानें जो आपलें वर्तन ठेवील त्याला कशाचीही भीति नाहीं व तो कोणासही हार जाणार नाहीं. तात्पर्य विजयी होण्यास मनुष्याच्या अंगीं खुबी ही अवश्य असली पाहिजे.

६ खुबी ही मोठ्या कामांत लागते आणि लहान कामांत लागत नाहीं असें नाहीं. तर सर्व कामांत तिचा सारखा उपयोग

---

( मागील पृष्टावरून पुढें चालू. )

बैर पडलें. तें इतकें कीं, त्यानें कांहीं दिवस यास कारागृहांत कोंडून ठेविलें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं बापाचें व याचें जमलें. बापाच्या मरणा नंतर यानें स्वपराक्रमानें कांहीं प्रांत जिंकले व इ० स० १७४८ च्या पुढचीं ८।१० वर्षें अगदीं शांतपणानें स्वराज्याची उन्नति करण्यांत घालविलीं. नामांकित फ्रेंच ग्रंथकार व तत्वज्ञानी व्होलटेर हा याचा स्नेही होता. इ० स० १७८३ या वर्षीं यानें राजाशीं बोलतेवेळीं गुडघे टेकून बोलण्याची जी चाल होती ती मोडून टाकिली. हा पराक्रमी असून मोठा तत्वज्ञानी होता.

१ दुसरा जोसेफः—जर्मनीचा बादशाहा. जन्म इ० स० १७४१. मृत्यु १७९०. हा राज्याधिरूढ झाल्यावर यानें सैन्यांत व राज्यपद्धतींत बऱ्याच सुधारणा केल्या. यानें प्रुशिया, इटली, फ्रान्स व रशिया या देशांतून प्रवास केला. १७८१ या वर्षी यानें आपल्या राज्यांत मुद्रणस्वातंत्र्याची परवानगी दिली. याच्या मनांत पोपचा अधिकार कमी करावा असें असून त्याबद्दल इतर राजांच्या साह्यानें त्यानें प्रयत्नही केले.

होतो.-एखाद्या राज्यकारस्थानी मनुष्याला खुबीची जितकी जरूरी लागते तितकीच एखाद्या गरीब कुटुंबवत्सल मनुष्यास लागते. अठरा कारखान्यांच्या मालकास खुबीची जितकी अवश्यकता असते तितकीच एखाद्या हिंगजिरें विकणाऱ्या लुंग्यासुंग्या दुकानदारास असते. लाखों रुपयांची घडामोड करणाऱ्या सावकारास खुबीचा जितका उपयोग होतो तितकाच एखाद्या पांचचार रुपये खर्च करणाऱ्या भिक्षुकास होतो. ग्लॅडस्टनें[1] सारख्या पार्लमेंटांतील नांवाजलेल्या सभासदास खुबीनें जितका जोर येतो तितकाच मुनसफ कोर्टांतील एखाद्या खर्डेघाशा कारकुनास येतो. कॉलेजांत कठिण विषय शिकवितांना एखाद्या बड्या प्रोफेसरास खुबीचा जितका उपयोग होतो तितकाच एखाद्या गरीब कुणब्यास एखादी टणक आणि खडकाळ जमीन नांगरतांना होतो. सारांश, खुबीचा उपयोग कोठें होत नाहीं असें नाहीं.

७ एखादा मनुष्य बुद्धिमान् आणि विद्वान् असला ह्मणजे त्याच्या अंगीं खुबी असतेच असें नाहीं. आणि खुबीशिवाय मनुष्य केवढाही बुद्धिमान् असला किंवा कसलाही विद्वान् झाला तरी त्याचें लोकांत हासें झाल्याशिवाय राहत नाहीं. एखाद्यास संपत्ति ह्मणजे काय, पैशाचा विनियोग कसा करावा, काटकसर कशी करावी इ० अर्थशास्त्रांतील सर्व गोष्टी माहीत आहेत पण त्याच्या पाठीमागें कर्ज उगविण्याकरितां सावकाराचे शिपाई लागले असतील तर त्याच्या फजितीस पारावार आहे काय ? तेथें काय करावयाचें आहे अर्थशास्त्र आणि काय करावयाची आहे बुद्धि ? दोन्ही असून

---

१ ग्लॅडस्टन:—( पान ४८ यांतील टीप पहा. )

नमून सारखींच आहेत. ड्रायडनें[1] एवढा मोठा कवि आणि ग्रंथकार होऊन गेला; पण कर्जापासून त्याला दूर राहतां आलें नाहीं हें काय कमी लांछनास्पद आहे? अॅडमास्मिथें[2] याचीही अशीच गोष्ट आहे. 'राष्ट्राची संपत्ति' या विषयावर बोलण्यांत व लिहिण्यांत मोठा पटाईत! पण आपल्या घरची नीट व्यवस्था त्याला लावतां येऊं नये यापरता त्याचा दुसरा अपमान तो कोणता? असो, वरील परस्पर विरुद्ध गोष्टीबद्दल आश्चर्य वाटण्याचें कांहीं एक कारण नाहीं. कारण, बुद्धि आणि विद्वत्ता यांचा खुबी किंवा व्यवहारज्ञान यांशीं नित्याचा संबंध असतोच असें नाहीं.

८ व्यवहारज्ञान चांगलें समजत नसल्यामुळें एका तत्ववेत्त्याची एकदां कशी फजिती उडाली हें खालील गोष्टीवरून कळून येईल.

उत्तर अमेरिकेंतील युनायटेडस्टेट्समध्यें व्हर्जिनिया म्हणून एक प्रांत आहे. त्या प्रांतांतील एका मोठ्या शहरांत एका कांतडे कमा-

---

१ ड्रायडन:—इंग्लिश कवि. जन्म १६३१. मृत्यु १७००. याचें शिक्षण वेस्टमिनिस्टर व केंब्रीज येथील पाठशाळांत झालें. यानें प्रथमत: इ० स० १६५८ या वर्षी क्रामवेलच्या मृत्युसंबंधानें शोकरस परिप्लुत कविता केल्या. त्या चांगल्या साधल्या असें पाहून पुढें त्यानें कविता करण्याचा क्रम सुरू ठेविला. हा कांहीं दिवस राजकवि होता. याला नाटकें लिहिण्याचाही मोठा नाद असे. यानें सरासरी २७ नाटकें रचलीं आहेत. त्यांतील शोकपर्यवसायी नाटकांबद्दल याची मोठी ख्याति आहे.

२ अॅडमस्मिथ:—स्कॉच अर्थशास्त्रवेत्ता. जन्म १७२३. मृत्यु १७९०. हा कांहीं दिवस ग्लॅसगो येथील पाठशाळेंत 'तर्क व नीतिशास्त्र' या विषयांवरील अध्यापक होता. यानें 'राष्ट्राची संपत्ति' या विषयावर एक मोठा थोरला ग्रंथ लिहिला आहे.

वणाऱ्यानें एक नवें दुकान घातलें. तें दुकान त्या शहरांतील भल्या मोठ्या रहदारीच्या रस्त्यावर होतें. त्या रस्त्यांत कापडाचीं, धान्याचीं, किराण्या जिनसाचीं, औषधांचीं, पुस्तकांचीं वगैरे बरींच दुकानें होतीं. व त्यांपैकीं प्रत्येक दुकानावर त्या त्या दुकानाची खूण लावली होती. कांतडे कमावणाऱ्यानें जव्हां आपलें दुकान त्या रस्त्यावर घातलें तेव्हां दुकानावर कोणती खूण लाविली असतां लोकांना तें चांगलें ओळखतां येईल याचा तो विचार करूं लागला. त्यानें पुष्कळ दिवस विचार केला पण चांगलीशी कल्पना कांहीं त्याच्या मनांत येईना. शेवटीं, त्याला एक युक्ति सुचली. ती अशीः—दरवाज्याजवळ भिंतीला लागून जो खांब आहे त्यांत एक भोंक पाडावें आणि त्यांत एका बैलाचें शेंपूट अडकवून ठेवावें. ही कल्पना सुचतांच त्यानें कमावण्याकरितां आणलेल्या कांतड्यांपैकीं एक बैलाचें कातडें घेतलें व त्याची शेंपूट तोडून काढून ती चांगली रंगविली व तिचा गोंडा पुढें लोंबत सोडून ती त्या खांबाच्या भोंकांत अडकविली. कांहीं वेळानें एक चाळीसी लाविलेला धिप्पाड व भव्य पुरुष इकडे तिकडे पहात त्या रस्त्यावरून जाऊं लागला. जातां जातां त्याची दृष्टी त्या शेंपटीकडे गेली. ती पाहून तो तेथेंच विचार करीत उभा राहिला. तो इतका वेळ राहिला कीं, कांतडेकमावणाऱ्याला त्याचें मोठें आश्चर्य वाटलें. शेवटीं, त्याचा हेतु काय आहे हें समजून घेण्याकरितां तो आंतून बाहेर आला आणि त्याला ह्मणाला—साहेब रामराम.

**गृहस्थ०**—रामराम.

**कांतडे कमावणारा**—साहेब, आपणास कांहीं कांतडे विकत घ्यावयाचें आहे काय?

**गृ०**—नाहीं.

का०—तर तुह्मी कांहीं कांतडे विकत देणार आहात कीं काय ?

गृ०—नाहीं.

कां०—तर मग तुह्मी कोणी वाणी उदमी आहात वाटतें.

गृ०—नाहीं.

कां०—तर काय कापडाचा व्यापार कारितां ?

गृ०—नाहीं.

कां०—तर मग तुह्मी डॉक्टर आहांत कीं काय ?

गृ०—नाहीं.

कां०—तर मग तुह्मी आहांत तरी कोण ?

गृ०—मी तत्ववेत्ता आहें. या ठिकाणीं एक तासभर उभा राहिलों आहें पण त्या भोंकांतून बैल आंत कसा गेला हें कांहीं मला नीट कळेना !

९ या प्रमाणें या जगांत कित्येक तत्ववेत्ते असे आहेत कीं, त्यांना व्यवहारज्ञान बिलकूल नसल्यामुळें ते वरील तत्ववेत्त्याप्रमाणें आपला वेळ व्यर्थ दवडितात व व निरर्थक गोष्टींचा उलगडा करण्या-साठीं उगीच श्रम करितात. करितां तत्ववेत्त्यांचेठायीं व्यवहारज्ञान अवश्य असलें पाहिजे. त्याखेरीज आपलीं मतें खरीं आहेत कीं खोटीं आहेत याचें त्यांना बिलकून ज्ञान होणार नाहीं. व व्यवहा-रिक लोकांनाही त्यांच्या तत्वापासून कांहीं एक उपयोग होणार नाहीं. ह्मणून इतर लोकांप्रमाणेंच तत्ववेत्त्यांचेंही या जगांत व्यहार-ज्ञानाशिवाय कांहीं चालणार नाहीं व त्यांना सुख मिळणार नाहीं.

# तात्काळ निर्णय करण्याची शक्ति.

१ आयुष्यांत सुख मिळण्यास मनुष्याच्या अंगीं जे गुण असावे लागतात त्यांतच तात्काळ निर्णय करण्याची शक्ति हा गुण अवश्य असला पाहिजे. ज्याला स्वावलंबन करितां येतें त्याच्याठायींच हा गुण दृष्टीस पडतो. ज्याची विचारशक्ति मोठी असते, ज्याला स्वतःच्या जोरावर काम करण्याची हिम्मत असते व ज्याला साध्य कोणतें आणि असाध्य कोणतें हें चांगलें कळतें त्याला कोणत्याही गोष्टीबद्दल तात्काळ निर्णय करितां येतो. जो मनुष्य एखादी गोष्ट 'करूं कीं न करूं' म्हणून उगीच वेळ घालवितो त्या सारखा गैदी दुसरा कोणीच नसेल. असल्या मनुष्याला सगळे लोक नांवें ठेवितात व व्यवहारांत त्याची मोठी फजिती उडते. आतां एक विचार, मग एक विचार, आतां एक भाषण, मग एक भाषण, अशी ज्याची वृत्ति असते त्याच्याहातून नेटाचें एकही काम होत नाहीं व त्याला कसल्याही कामाचा बोजा अगदीं खपत नाहीं. व्यवहारांत वागणाऱ्या मनुष्याला कोणत्याही गोष्टीबद्दल बिनचूक तर्क करून योग्य निर्णय करितां आला नाहीं म्हणजे समुद्रांत पडलेलें लांकूड लाटा येतील त्याप्रमाणें जसें हेलकावे खात जातें तसें त्याची चंचलवृत्ति जिकडे त्याला नेईल तिकडे तो हेलकावे खात जातो.

२ तात्काळ निर्णय करण्याची शक्ति ज्याचेठायीं आहे तो प्रसंगविशेषीं तात्काळ जगापुढें येतो. एखाद्या मनुष्याला एकाएकी मोठी जखम झाली किंवा भीतीनें अगदीं दांतखिळी बसली अथवा असल्याच प्रकारची दुसरी एखादी जबर इजा झाली म्हणजे त्याच्या

सभोंवती लोकांची मोठी दाटी जमते व सगळें आपापल्यांत 'असें कसें झालें हो!' 'कोठली बुद्धि सुचली आणि यानें असें केलें! याविणें याचें काय अडलें होतें? आतां हा कमचा वांचतो! बिचारा व्यर्थ प्राणास मुकणार!' अशी कुजबुज करीत व हळहळत स्वस्थ उभे राहतात. पण इतक्यांत त्यांपैकीं एक गृहस्थ दाटींतून तुरमुंडी देत देत मोठ्या धिटाईनें पुढें येतो व शांतवृत्तीनें पळें दोन पळें त्याकडे पाहून त्याची एकंदर स्थिति ध्यानांत आणितो आणि त्यावर कोणती तोड योजावी याचा निर्णय करून तो ती तात्काळ अंमलांत आणितो व त्याला दुःखमुक्त करितो. असें झालें ह्मणजे लोकांना त्या मनुष्याचें मोठें आश्चर्य वाटतें व ते त्याची तारीफ करितात. आणि तारीफ करितात ती वाजवीच करितात. कारण तात्काळ निर्णय करून त्याप्रमाणें कृति करण्याची विलक्षण शक्तिच त्याच्या अंगीं असते. अशा प्रकारचे लोक घरास एकदम आग लागली असतां प्राणहानी न होऊं देतां आंतील चीजवस्त बाहेर काढितात. अशा प्रकारचे लोक गलबतावर असतांना तुफान होऊन गलबत फुटलें तर लोकांना धीर देऊन मोठ्या युक्तीनें त्यांना किनाऱ्यावर पोंचवितात. अशा प्रकारचे लोक लढाईत असताना तींत अपजय आला तर भित्र्यासारखा पळ न काढितां युक्तिप्रयुक्तीनें आपलें संरक्षण करितात व बरोबरच्या लोकांना धीर देऊन जय मिळविण्याची खटपट करितात. अशा प्रकारचे लोक वेढ्यांत सांपडले ह्मणजे उगीच धांवपळ न करितां चोरवाटा कोणीकडे आहेत, कोणीकडून गेलें असतां आपण शत्रूच्या हातीं लागणार नाहीं याचा विचार करून शत्रूला नकळत एकदम पार होतात.

२ तात्काळ निर्णय करण्याची शक्ति ही पुष्कळ अंशीं शारीर शक्तीवर अवलंबून आहे. ह्मणजे शरीर ज्या मानानें बळकट

त्यांना वाटतें. मनाची चंचलता नाहींशी करून दृढनिश्चय आपल्या अंगीं आणणें व दृढनिश्चयाप्रमाणें आपण कृति करणें हे गुण शरीर दुर्बल असलें तरी संवयीनें मनुष्याला आपल्या अंगीं आणितां येतात. आतां शरीरप्रकृतीच्या मानानें ते कमी अधिक आणितां येतात. पण आणितां येतात हें खास.

४ तात्काळ निर्णय करण्याची शक्ति ही इतकी महत्वाची आहे कीं, प्रसंगविशेषीं तिचा विचारशक्तीपेक्षांही अधिक उपयोग होतो. आतां तात्काळ निर्णय केल्यानें मनुष्याचें केव्हां केव्हां पुष्कळ नुकसान होतें हें खरें आहे. पण निर्णय न करितां स्वस्थ बसल्यानें त्याचें जितकें नुकसान होतें त्यापेक्षा निर्णय केल्यानें त्याचें कमी नुकसान होतें. याचें कारण असें कीं, ज्या मनुष्याचे ठायीं निर्णय करण्याची शक्ति असते तो प्रसंग, वेळ, परिस्थिति इ० गोष्टी लक्ष्यांत आणिल्याशिवाय कोणत्याही गोष्टीचा निर्णय करीत नाहीं. आणि तितक्या गोष्टी लक्ष्यांत आणून त्यानें कोणत्याही गोष्टीचा निर्णय केला कीं, त्याला क्वचितच अपाय होतो.

५ तात्काळ निर्णय करण्याच्या शक्तीला कोणी कोणी दुराग्रह ह्मणतात. पण हें ह्मणणें चुकीचें आहे. दुराग्रह हा मनाच्या दुर्बलपणाचा परिणाम आहे आणि तात्काळ निर्णय करण्याची शक्ति हा मनाच्या बळकटपणाचा परिणाम आहे. जो तात्काळ निर्णय करितो त्याला कोठें हार जावें हें चटकन् कळतें व तेथें तो चटकन् हारही जातो. जो दुराग्रही आहे त्याचा मुद्दा खरा असो अथवा खोटा असो, तो हार ह्मणून बिलकुल खावयाचा नाहीं. भितरा, अविचारी व संशयखोर असतो तोच दुराग्रही असतो. धीट, विचारी व निग्रही मनुष्याला दुराग्रहाचें वारें सुद्धां लागलें नसतें.

६ या जगांत मनुष्याला एखादें श्लाघ्य कृत्य करावयाचें झाल्यास त्यानें अनेक संशय व अनेक चिकित्सा काढून फुकट वेळ न घालवितां त्याच्या सर्व बाजूंनीं एकदां चांगला विचार करून तें एकदम करण्यास लागावें. संधि केव्हां येईल, वेळ कोणता काढावा, कोणतीं साधनें जुळवून ठेवावींत असा नुसता विचार करून कोणतेंही कार्य केव्हांही तडीला जाणार नाहीं. कार्यारंभीं त्याचा विचार केला पाहिजे हें तर खरेंच, पण नुसत्या विचारांतच सगळा वेळ न घालवितां एकदम निर्णय करून कार्यास लागलें पाहिजे. नाहींतर फजिती होऊन कार्य सिद्धीस जात नाहीं.

७ ज्याचे अंगीं निर्णय करण्याची मोठी शक्ति असते तो हातीं घेतलेलें कार्य तडीस जात नाहीं असें त्याला वाटलें कीं, तें सोडून देण्यास मार्गे पुढें पहात नाहीं. पण तें आपल्याहातून होत नाहीं असें त्याला पक्कें कळेपर्यंत त्याचा पिच्छा पुरविल्यावांचून तो राहत नाहीं. आणि मनुष्याला सगळ्या कामांत जय मिळतो तो या गुणामुळेंच मिळतो. तात्काळ निर्णय करण्याची शक्ति ही इतकी विलक्षण आहे कीं, तिच्या जोरावर मनुष्याला काय पाहिजे तें करितां येतें व त्याला काय पाहिजे तें होतां येतें. ज्याचे ठायीं तात्काळ निर्णय करण्याची शक्ति नाहीं तो सुकाणु नसलेल्या जहाजा सारखा आहे. सुकाणु नसलेलें जहाज जसें महासागरांत पाहिजे तिकडे भटकतें, तसें ज्याचेठायीं ही शक्ति नाहीं तो संसाररूपी महासागरांत पाहिजे तिकडे भटकतो व त्याला एकही आश्रयस्थान सांपडत नाहीं. ह्मणून मनुष्यानें तात्काळ निर्णय करण्याची शक्ति अंगीं आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्या खेरीज त्याचें आयुष्य सुखासमाधानानें जाणार नाहीं व त्याचे पासून समाजाचेंही हित होणार नाहीं.

८ एका थोर गृहस्थाचें असें वचन आहे कीं, मनुष्याचीं सगळीं कामें सुरक्षितपणें चालण्यास व दरएक कामांत त्याला सिद्धि मिळण्यास त्याचे ठायीं सारासारविचारशक्ति व तात्काळ निर्णय करण्याची शक्ति हे दोन गुण अवश्य असले पाहिजेत. एकाचेठायीं त्यापैकीं एक असूं शकेल, दुसऱ्याचे ठायीं दुसरा असूं शकेल व तिसऱ्याचेठायीं ते दोन्ही असूं शकतील. आणि ज्याचे ठायीं ते दोन्ही असतील त्याची एकेकटा गुण अंगीं असलेल्या मनुष्यांपेक्षां अधिक रीझ पडेल व त्याचा विशेष फायदा होईल यांत संशय नाहीं. सैन्यांतील अधिपतीच्याठायीं, जहाजावरील तांडेलाच्याठायीं, वक्त्याचेठायीं, वैद्याच्याठायीं व वकिलाच्याठायीं वरील दोन्ही गुण तर अवश्य असले पाहिजेत. एक गुण अंगीं असून त्यांचें चालणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर प्रसंगविशेषीं दुसऱ्या गुणाच्या अभावामुळें त्यांचें सर्वस्वी नुकसान होईल.

९ तात्काळ निर्णय करण्याची शक्ति याचे पोटीं प्रसंगावधान हा गुण येतो. व प्रसंगावधानाचा मनुष्याला व्यवहारांत पावलोपावली उपयोग होतो. प्रत्येक मनुष्य नेहमीं कसला नाहीं कसला तरी उद्योग करीत असतो व दर घडीस त्याच्या हातून काहीं नाहीं काहीं तरी क्रिया घडत असते. पण ज्याचे अंगीं प्रसंगावधान असतें त्याचीच क्रिया नेहमीं फलद्रूप होते. इतरांची होत नाहीं. प्रसंगावधानानें मनुष्याला मोठें अरिष्ट असलें तरी तें टाळतां येतें, व प्रत्यक्ष कोणाच्या जिवावर बेतली तरी त्यांतून सुटका करितां येते! या विषयीं दोन तीन मजेदार उदाहरणें देऊन आह्मी हें प्रकरण आटोपतों.

१० एकदां नानाफडनवीस[1] हे साताऱ्यास असतां शिंद्याचे दिवाण बाळोबा तात्या कुंजर यांनीं पुण्यास त्यांच्या विरुद्ध मसलती चालवून त्यांना कैद करण्याचा घाट घातला. व या कामगिरीवर बहिरोपंत मेंहदळे व विसाजीपंत वाडदेकर या दोघां गृहस्थांची नेमणूक केली. मेहंदळे हा नानांचा पक्का द्वेषी बनला होता. पण वाडदेकराच्या मनांत नानांनीं आपणावर पुष्कळ उपकार केले आहेत तेंव्हां त्यांचा घात करणें वाजवी नव्हे असें वाटत होतें. पण ही गोष्ट मेहंदळे याच्यापुढें बोलण्यास त्याला धैर्य होईना. पुढें हे दोघे साताऱ्यास गेल्यावर नानांची भेट घेऊन त्यांस ह्मणूं लागले कीं, आतां तुह्मी पुण्यास येऊन पूर्वी प्रमाणें राज्याचा कारभार आपल्या हातीं घ्यावा अशी बाळोबा व परशुरामभाऊ यांची इच्छा आहे. करितां तुह्मी पुण्यास चला. यावर नाना ह्मणाले कीं, पुण्यास आपणास सध्यां येण्यास सवड होत नाहीं. याप्रमाणें बोलणें चाललें असतां कनवटीस जागणाऱ्या वाडदेकरानें नानांवर यावेळीं भयंकर संकट आलें आहे असें पाहून हळूच आपल्या कानावर जानवें ठेविलें. इतकी इशारत नानांस बस्स झाली. त्यांनीं बहिरोपंतास सांगितलें कीं, तुह्मी अंमळ येथेंच बसा, मी आंत जाऊन येतों. असें सांगून लघुशंका अथवा बहिर्दिशेच्या निमित्तानें नाना जे आंत गेले ते परसाच्या दारानें घराबाहेर पडले व पालखींत बसून थेट वांईस आले. त्यांचा हितचिंतक वाडदेकर हा जर त्यावेळीं पळून जाण्याविषयीं नानास इशारा न करिता तर मेहंदळे नानांस खचित कैद करता. वाडदेकराच्या प्रसंगावधानानें नानावरचें हें मोठेंच अरिष्ट टळलें ह्मणावयाचें !

---

१ नानाफडनवीस:—( पान १८ यांतील टीप पहा. )

११ दुसरें उदाहरण सर जेम्स थॉर्नहिलचें. थॉर्नहिल हा इंग्लंडांत एक प्रख्यात चितारी होऊन गेला. यास एकदां सेंटपॉल नांवाच्या मठाला रंग देण्याच्या कामावर नेमिलें होतें. मठाला मोठ मोठे घुमट आहेत. एके दिवशीं घुमटाच्या आंतील बाजूस तो एक चित्र काढित असतां तें लांबून कसें काय दिसतें हें पाहण्याचें त्याच्या मनांत आलें. ह्मणून मागें मागें सरत तो ज्या पायाडावर उभा राहिला होता त्याच्या अगदीं कडेजवळ आला आणि जर तो आणखी एक पाऊल मागें टाकिता तर खालीं फरशीवर पडून त्याचे तुकडे तुकडे झाले असते. पण या वेळीं त्याचा एक चाकर त्या चित्राजवळ उभा होता त्यानें आपल्या धन्यावर हें भयंकर संकट आलें आहे असें पाहून जवळच एक रंगाचें भांडें हातें नें उचलिलें आणि एकदम त्या चित्रावर फेंकून दिलें. त्याबरोबर थॉर्नहिल याला अतिशय राग येऊन तो आपल्या चाकराच्या आंगावर धांवून गेला. पण चाकरानें तसें करण्याचें कारण जेव्हां आपल्या धन्यास सांगितलें तेव्हां थॉर्नहिलनें त्याचे फार फार आभार मानिले व त्याच्या युक्तीची त्यानें फार तारीफ केली. त्याचा चाकर जर त्यावेळीं आपणावर असें असें संकट आलें आहे, असें थॉर्नहिल याप मोठ्यानें सांगता तर तो दचकून एकदम पायाडाखालीं पडता व प्राणास

१ सर जेम्स थॉर्नहिल:—इंग्लंडांतील प्रख्यात चितारी. जन्म इ० स० १६७६. मृत्यु १७३४. यानें सेंट पॉलचा घुमट, हॅम्प्टन कोर्ट व ग्रीनवुइच येथील हॉस्पिटल हीं फार सुरेख रंगविलीं आहेत. सेंट पॉलचा घुमट रंगविण्यास यानें प्रत्येक चोरस यार्डास ५०० रुपये याप्रमाणें आकार घेतला आहे असें ह्मणतात. राणी ॲन व राजा पहिला जॉर्ज यांचा कित्येक दिवस याला आश्रय होता. हा कांहीं दिवस पार्लमेंटचा सभासदही होता.

मुकता. पण चाकरानें तसें न करितां चित्रावर एकदम रंग टाकिला म्हणूनच तो वांचला.

१२ तिसरें उदाहरण अगदीं व्यवहारांतलें असून इंग्लंडांतील रॉबेटसन नांवाच्या एका बाईचें आहे. ही बाई रूपवती असून स्वभावानें फार सुशील होती. प्रपंचांतील गोष्टींचें तिला चांगलें ज्ञान असून ती फार चतुर होती. एकदां अशी गोष्ट घडली कीं, एके दिवशीं रात्रीं जेवण आटोपल्यावर नित्याप्रमाणें ती आपल्या निजावयाच्या खोलींत गेली. त्या दिवशीं तिच्या घरांत एका कुणबिणीच्या मुलीशिवाय दुसरें चाकरमाणूस कोणी नव्हतें. खोलींत गेल्यावर निजण्याच्या मंचकाखालीं छपून बसलेल्या एका मनुष्याचा पाय तिच्या दृष्टीस पडला. तो पाहून तिनें असें ताडिलें कीं, कोणा तरी दुष्ट मनुष्यानें आपला घात करण्याकरितां या मनुष्याची येथें योजना केली असावी. मग न गांगरतां त्या प्रसंगांतून सुटण्याची तिनें एक नामी युक्ति योजिली. ती मोठ्यानें म्हणाली—" काय बाई मी विसराळू! मी गडबडीनें येथें आलें खरें पण या पेटीच्या किल्ल्याच बाहेर विसरून आलें कीं ! " असें म्हणून ती खोलीच्या बाहेर आली. आपल्याला पाहून तिनें असें केलें हें त्या छपलेल्या मनुष्याच्या मनांत मुळींच आलें नाहीं. ती आतां येईल मग येईल म्हणून तो तिची सारखी वाट पहात बसला होता. इतक्यांत त्या स्त्रीनें बाहेरच्या लोकांना बोलावून आणिलें व त्याच्या मुसक्या आंवळल्या ! त्या स्त्रीचें हें प्रसंगावधान पाहून कोणास अचंबा वाटणार नाहीं ! *

* वरील उदाहरण लिहीत असतां ' नेटिव ओपिनियन ' पत्रांत प्रसिद्ध झालेली पुढील गोष्ट वाचण्यांत आली. तिचें वरील गोष्टीशीं अगदीं साम्य असून ती फार मजेदार असल्यामुळें येथें देतों:—

" लाहोर येथील एका पत्रांत एका अकरा वर्षाच्या मुलीच्या शहाणपणाची (प्रसंगावधानाची ह्मटल्यास अधिक शोभेल) पुढील गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. ही व तिची धाकटी नऊ वर्षाची बहिण अशा दोघीजणी आपल्या घराच्या माडीवर खेळत होत्या. त्यावेळीं त्यांच्या घरांतील सर्व मनुष्यें बाहेर गेलीं होतीं. ही संधी साधून कांहीं चोर त्या घरांत शिरले. त्याबरोबर थोरली मुलगी भीतीनें अगदीं गांगरून गेली. परंतु आतां जर आपण ओरड केली तर हे चोरटे आपल्यास व आपल्या बहिणीस जिवें मारल्याशिवाय रहावयाचे नाहींत असा विचार तिच्या मनांत येऊन तिनें ओरड केली नाहीं व आपली भीति आपल्या बहिणीसही दाखविली नाहीं. चार पांच मिनिटें विचार करून तिनें आपल्या बहिणीजवळ बोलण्याचा विषय निराळाच काढिला तो विषय हाच कीं, आपण मोठ्या झालों ह्मणजे आपल्यास मुलें किती होतील. यासंबंधानें ती आपल्या बहिणीजवळ मोठ मोठ्यानें बोलूं लागली. त्याबरोबर तिची बहिणही तिच्या बरोबर मोठ्यानेंच बोलूं लागली. हें बोलणें ऐकून चोरासही मोठी मजा वाटली. त्यामुळें त्यांनीं त्यांच्या बोलण्यांत हरकत घेतली नाहीं. त्यांचें बोलणें चालले असतां थोरल्या बहिणीनें धाकटीस सांगितलें कीं, मला वीस मुलें होतील व मी त्यांचीं नांवें अशीं अशीं ठेवीन. असें ह्मणून तिनें एका मागून एक मोठमोठ्यानें वीस नांवें घेतलीं. हें तिचें नांवें घेण्याचें काम चाललें असतां चोरांस मोठें कौतुक वाटून त्यांचें सामानाचीं हवलाहवल करण्याचें काम चाललेंच होतें. तिचीं नांवें जों संपतात तों वीस लोक हातांत सोटे घेऊन घरांत शिरले. तिनें नांवें जीं घेतलीं तीं याच आपल्या शेजाऱ्याचीं घेतलीं होतीं. त्यावेळीं त्या गांवांत चोरांचा फारच सुळसुळाट झाला होता. व त्यामुळें त्या मुलीच्या ओरडण्यावरून तिच्या घरांत चोर शिरले ह्मणून ती आपल्यास हांका मारीत आहे असें त्यांस वाटून ते तावडतोब काठ्या घेऊन धांवले. ते घरांत गेल्या बरोबर चोरांचें काय झालें असेल हें सांगणें नकोच. परंतु मुलीच्या शहाणपणाची व धैर्याची तारीफ करावी तितकी थोडीच ! !

समाप्त.